# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०९/१२/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०९/१२/२००५ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. ०५/१२/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ११) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १२) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, हेड ऑफ दी डिपार्टमेन्ट आणि मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे या सभेमध्ये स्वागत करतो. या सभेसाठी नविन मा. उपायुक्त (मु.) श्री. बालाजी खतगांवकर हे ठाणे महानगरपालिकेतून आपल्याकडे आलेले आहेत. आपण सर्वांच्या वतीने त्यांचे स्वागत करुया. त्याचप्रमाणे आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी अपेक्षा करतो. आणि सचिवांनी सभेला सुरुवात करावी अशी मी त्यांना सुचना करतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

या सभेला नव्याने नियुक्त झालेले उपायुक्त (मु.) श्री. बालाजी खतगांवकर यांची ओळख करुन दिलेली आहे. त्यांनी त्यांचे चार शब्द सांगावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या सभेला उपस्थित असलेले मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, या सभेचे सचिव, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग मी या ठिकाणी माझी ओळख करुन देतो. मी श्री. बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये पाच तारखेला या ठिकाणी या पदावर रुजु झालेलो आहे. मी यापूर्वी ठाणे महानगरपालिकेत परिवहन सेवे अंतर्गत परिवहन व्यवस्थापकाच्या पदावर कार्यरत होतो. मी नगरविकास विभागाचा अधिकारी आहे. मी महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या १९८७ बॅचमधील आहे. मी एम.पी.एस.सी. तर्फे रुजु झालेलो आहे. मी यापूर्वी पनवेल नगरपरिषद, जालना नगरपरिषद, जिल्हा जालना, हिंगोली नगरपरिषद, जिल्हा हिंगोली, परळी वैजनाथ नगरपरिषद व देगलुर नगरपरिषद आणि सध्या नांदेड महानगरपालिकेच्या ठिकाणी मी १९८९ ला पर्यवेक्षाधीन मुख्याधिकारी होतो.

आमचे मुंबई येथे ऑल इंडिया इन्स्टीट्युटमध्ये एक वर्षाचे प्रशिक्षण झालेले आहे. मला या प्रशासनात सतरा वर्षाचा कालावधी होत आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

तुमचे गांव कुठले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी मुळ नांदेड जिल्ह्याचा आहे. माझे गांव खतगांव आहे आणि तालुका गुलोली आहे. माझे शिक्षण मराठवाडा कृषी विद्यापिठामध्ये मी एम.एस.सी. फर्स्ट ईयरला असताना माझे सिलेक्शन झालेले आहे. ॲग्रीकल्चर डिपार्टमेन्ट आहे. मी सॉईल ॲन्ड वॉटर मॅनेजमेन्टमध्ये एम.एस.सी. फर्स्ट ईयर पूर्ण केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला सर्वांचे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १५६ :-**

आजच्या सभेला श्री. बालाजी खतगावकर, मा. उपायुक्त (मु.) सो. हे प्रथमच उपस्थित राहिलेले आहेत. त्याबद्दल आम्ही त्यांचे धन्यवाद करतो. तसेच, यापुढच्या कालावधीत त्यांनी चांगले निर्णय घेण्याची त्यांच्याकडून अपेक्षा बाळगतो आणि त्यांना उत्तरोत्तर चांगले कार्य करावे असा मी ठराव मांडत आहे. तसेच काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीम. सोनिया गांधी यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना सर्व भाईंदर वासियांतर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

माझा दुसरा असा प्रश्न आहे की, नागपूर अधिवेशनामध्ये मिरा भाईंदर विषयी काही लक्षवेधी सुचना आलेल्या आहेत का? तुम्हाला त्याची माहिती आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आजच्या अधिवेशनाबाबत लक्षवेधी सुचना आलेली नाही.

**जयंत पाटील :-**

परवा नागपूर अधिवेशनमध्ये मिरा भाईंदरच्या जमिनी संबंधिचे ॲलेक्टीव्ह आलेले आहेत. श्री. रामदास कदम आणि शिवसेनेचे जे इतर आमदार आहेत त्यांनी हा प्रश्न उठवलेला आहे. ती ३५ एकर मधील सरकारी जागा आहे. त्या जागेवर अनधिकृत बांधकाम झालेले आहे. आपल्याला सरकारी जागेविषयी देणे-घेणे नाही. त्या जागेवर अनधिकृत बांधकाम झाल्याचे ॲलेक्टीव्ह आजच्या नवशक्तीमध्ये आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तसे ॲलेक्टीव्ह प्रत्येक पेपरमध्ये आहे.

**जयंत पाटील :-**

त्यासंबंधीची माहिती अधिकाऱ्यांना आहे का? आणि अनधिकृत बांधकाम झालेले आहे का? अनधिकृत बांधकाम करायला टॅक्सवाले परमिशन कसे देतील?

**सुर्यकांत भोईर :-**

अनधिकृत बांधकामाला अतिक्रमणवाले परमिशन देतात.

**जयंत पाटील :-**

अतिक्रमणवाले किंवा ए.टी.पी. वाले अनधिकृत बांधकामाला परमिशन कसे देतील?

**मा. सभापती :-**

त्या लोकांनी आपल्याकडून माहिती मागितलेली आहे का?

**जयंत पाटील :-**

आपल्याकडून माहिती मिळाल्याशिवाय ती लोक ॲलेक्टीव्ह कसे देतील?

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांच्यावर खटला भरायचा आदेश दिलेला आहे.

**जयंत पाटील :-**

भाईंदर चौक येथील पस्तीस ऐकरचा भुखंड बत्तीस जणांकडून हडप अशा प्रकारची बातमी आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्या मुख्यालयाकडून त्यांना अशात-हेची माहिती गेलेली होती. मागच्या वेळेला श्री. अशोक मोडक हे आमदार आलेले होते. त्यावेळेला आपल्या मुख्यालयाचा चार्ज श्री. अशोककुमार रणखांब साहेबांकडे होता. त्याबद्दल थोडीशी चर्चासुध्दा झालेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

या विषयाची माहिती नगरविकास खात्याकडे उपलब्ध असेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्या प्रॉपर्टीला काही टॅक्स लावलेला आहे का?

**विजय पाटील :-**

चौक गांवामध्ये जी घरे आहेत त्यांना घरपट्टी कराची आकारणी कधी व केव्हा झाली याची यादी तलाठी कार्यालयामध्ये घरपट्टी विभागातुन दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. विजय पाटील, तुम्ही आजची बातमी वाचलेली नाही. आजच्या बातमीमध्ये चौकच्या घरासंबंधीचा उल्लेख केलेला नाही. खुप मोठी मोठी लोक आहेत. असे पेपरला आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही पेपरमधील बातमी वाचून दाखविली तर ती बातमी सगळ्या सन्मा. सदस्यांना समजेल.

**प्र. सचिव :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने मी या ठिकाणी या बातमीचे वाचन करीत आहे. नागपूर दि. ८ ठाणे जिल्ह्यातील भाईंदर चौक येथे सुमारे पस्तीस ऐकर गुरुचांदणीचा भुखंड बत्तीस जणांनी अनधिकृतपणे ताब्यात घेतलेला असून या प्रकरणी नोंदी करणा-या मंडळ अधिकारी तलाठी यांना निलंबित केलेले आहे. त्याच्यावर गुन्हे दाखल केले असून या प्रकरणी वरिष्ठ अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्या विरुध्द देखील कारवाई केली जाईल. असे महसुल राज्यमंत्री श्री. राजेन्द्र शिंगाणे यांनी सांगितले. श्री. रामदास कदम, श्री. दत्ताजी नलावडे, श्री. दगडू सकपाळ, श्री. एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीवर त्यांनी वरील उत्तर दिले. भुखंड ताब्यात घेणा-या त्या बत्तीस जणांविरुध्द पोलिस खटले दाखल करतील तसेच या जागी जी अनधिकृत बांधकामे केलेली आहेत ती जमिनदोस्त केली जातील असे श्री. शिंगाणे यांनी या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. भाईंदर चौक येथे ९९.६० हेक्टर इतक शासकीय भुखंड असून त्यापैकी १३.९० हेक्टर जमिनीवर नोंदी करुन अतिक्रमण करण्यात आलेले आहे असे ते म्हणाले. बत्तीस जण हे राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आहेत. वरिष्ठांच्या संमतीशिवाय एवढ्या मोठ्या नोंदी होणे शक्य नाही. या बत्तीस जणांविरुध्द गुन्हे केव्हा दाखल करणार? वरिष्ठ अधिका-यांना पाठीशी घातले जात आहे असा आरोप श्री. दगडू सकपाळ, श्री. एकनाथ शिंदे यांनी करताच त्या सर्वांवर गुन्हे नोंदले जातील, जे अधिकारी ह्याच्यामध्ये सामील असतील त्यांच्यावर कारवाई करुन अनधिकृत बांधकामे पाडली जातील असे श्री. शिंगणे यांनी सांगितले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती जागा सरकारी आहे का?

**जयंत पाटील :-**

परंतु, आपल्या शहरामध्ये बांधकाम झालेले आहे याची अतिक्रमण विभागाला माहिती होऊ दे.

**मा. सभापती :-**

हा जो खटला झालेला आहे. आपण हा विषय तपासुन त्यानुसार माहिती घेऊया. आणि आपण हा विषय या मिटींगला किंवा पुढच्या मिटींगला घेऊया. कारण याचे संबंधित अधिकारी हजर नाहीत.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, मागच्या मिटींगमध्ये नवघरची शाळा क्र. १३ बाबत विचारलेले होते की, ती शाळा भाड्याने देता येते का? त्यावेळेला आपल्याला मा. आयुक्तसाहेबांनी एक ठराव दिलेला होता, त्या ठरावात जो उल्लेख केलेला होता तो उल्लेख या ठिकाणी नाही. मी दि. १६/१०/२००३ चा प्रकरण क्र. १४८ ठराव क्र. १२८ असा होता - नवघर शाळा मैदान मालवणी जत्रोत्सवासाठी भाड्याने देण्याची परवानगी रद्द करणेबाबत. मिरा भाईंदर महापलिका हद्दीतील नवघर (पूर्व) येथे शाळेचे मैदान शैक्षणिक व सामाजिक संस्थांना तसेच सुट्टीच्या दिवसात खाजगी संस्था व नागरिकांना भाड्याने देणेबाबत. या ठरावाचे सुचक श्री. दिनेश नलावडे होते आणि अनुमोदन श्री. हरेश गावंड होते. हा ठराव झाला असताना तुम्ही हे परमिशन कसे दिले? तुम्ही हा ठराव बघा. ते मैदान भाड्याने का दिले? आपल्याला त्या मैदानाची सात दिवसात काय माहिती मिळाली? आज तिथे जत्रोत्सव एक महिना चालणार आहे. एकतर पहिल्यांदा शाळा बंद करा किंवा तुमची जत्रा चालवा. तुम्ही दोन्हीपैकी काहीतरी एक करा. ठराव सन २००३ आणि सन २००४ मध्ये झालेला आहे. तुम्ही ते मैदान कोणाच्या ह्याच्यासाठी देता तेच कळत नाही.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांनी ते मैदान कोकण महोत्सवासाठी भाड्याने दिले जाईल असे सांगितलेले होते.

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेचे मैदान सुट्टीच्या दिवसात भाड्याने देण्याबाबतचा ठराव झालेला आहे. तुम्ही ते मैदान कोणालाही सुट्टीच्या दिवसात भाड्याने द्या. तुम्ही तो ठराव वाचा. हा ठराव सन २००४ मध्ये झालेला आहे. तुम्ही आज शाळेची काय परिस्थिती आहे ते बघा. मुले शाळेत जाऊ शकत नाहीत. ती मुले शाळेत कशी जाणार ते तुम्ही बघा. तुम्ही ह्याच्यावर सात दिवसामध्ये काय इन्क्वायरी केलेली आहे? आज मिटींग होऊन दहा बारा दिवस झालेले आहेत. तुम्हाला ह्याच्याबाबतीमध्ये काय माहिती मिळाली याचा खुलासा करावा.

**कैलासबेन जानी :-**

याच्यामुळे मुलांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे.

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेचे मैदान सुट्टीच्या दिवसात भाड्याने द्यावे असे सरळ लिहलेले आहे. तुम्ही याचे पुढे काय करणार? मग तुम्ही उद्यापासून शाळा बंद करा. ह्याच्यावर शिक्षण अधिकाऱ्यांनी त्यांचे मत मांडावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

शिक्षण अधिकारी हजर नाहीत.

**रतन पाटील :-**

त्या मैदानात तमाशे ठेवा, झुले लावा.

**गजानन भोईर :-**

आपण मुलांना कपडे देतो, धान्य देतो सगळे व्यवस्थित देतो. जर मुले शाळेत जात नसतील आणि शाळेत व्यवस्थित शिकवत नसतील तर काय उपयोग आहे?

**रतन पाटील :-**

आपण ऐवढे सगळे कशासाठी करतो? एक-दोन ठराव कशासाठी होतात? कारण ठरावाची अंमलबजावणी होत नाही.

**गजानन भोईर :-**

आपण हे ठराव कशासाठी करतो?

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की, जत्रोत्सवविषयी आपली चर्चा चालू होती. चर्चा चालू असताना सर्व सन्मा. सदस्यांनी विनंती केली की, मा. आयुक्त महोदयांनी या सभेला यावे आणि या विषयावर चर्चा करावी. त्याप्रमाणे मा. आयुक्तसाहेबांनी या विषयावर चर्चा केलेली आहे. या विषयाबाबत विस्तृतपणे माहिती घेऊन त्यांनी त्यांचा कार्यक्रम चालू ठेवण्याचे निर्देश त्या ठिकाणी दिले. अशा पध्दतीचे कार्यक्रम कोणत्या पध्दतीने त्या शालेय मैदानावर घेतले पाहिजे किंवा नाही अशा पध्दतीचा एखादा विषय आणायचा. कारण या ठिकाणी मैदाने हा विषय टाकलेला आहे. शाळेचे आवार हे मैदान होऊ शकत नाही. जसे सुभाषचंद्र बोस हे मैदान आहे. मैदाने या शब्दाची व्याख्या क्लिअर व्हावी म्हणूण हा विषय पुन्हा आणून त्याची विस्तुत चर्चा करुन त्याच्यावर निर्णय घ्यावा अशा पध्दतीची चर्चा झाली. ती चर्चा झाल्यानंतर त्या महोत्सवाला परवानगी नाकारु नये असे मा. सभापतींनी रुलिंग दिलेले होते. या ठिकाणी ती चर्चा मा. आयुक्त साहेबांनी केलेली होती. सन्मा. सदस्य गजानन भोईर यांनी या ठिकाणी जो ठराव आणलेला आहे त्याबाबत मागच्या वेळेला मा. सभापतींनी विषय घ्यायला सांगितलेला होता. तो विषय घेऊन त्याचे पर्टीक्युलरली काय निर्देश आहेत त्याची नक्की काय व्याख्या आहे? ते ठरवून आपण पुढच्या मिटींगमध्ये ते क्लिअर करावे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी एका नाण्याच्या दोन बाजु सांगितल्या. त्यांनी आवार आणि मैदानाबाबत सांगितले. आम्ही आवाराबद्दल बोलत नाही. हा एवढा भाग म्हणजे आवार असतो. आम्ही मैदानविषयी बोलत आहोत. शाळेच्या समोर जी जागा सोडलेली आहे ते मैदान आहे. आपण त्याला वेगळे हे देऊ नये.

**एस. ए. खान :-**

शाळेच्या मैदानात जुगार वगैरे चालवायला बंदी करावी. सगळ्यांचे जुगाराबाबत ऑबजेक्शन होते.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांनी नवघर शाळेच्या मैदानाला सात दिवसात कशासाठीही परमिशन देऊ नये असे सांगितले होते. तुम्हाला संपूर्ण वर्षभर मैदान भाड्याने द्यायचे असेल तर संपूर्ण वर्षभर मैदान भाड्याने दिले तरी आम्हाला काहीही हरकत नाही. त्याच्यामुळे महानगरपालिकेला इन्कम मिळेल.

**एस. ए. खान :-**

मागच्या मिटींगमध्ये तिथे जुगार वगैरे चालणार नसल्याचे ठरले होते.

**गजानन भोईर :-**

तुम्ही शाळा बंद करा. मा. सभापतींनी शाळा बंद करायची की शाळेचे मैदान भाड्याने द्यायचे याच्यावर निर्णय द्यावा.

**एस. ए. खान :-**

शाळा बंद करायची नाही. परंतु, ह्याच्यापुढे काय करायचे तो निर्णय देण्यांत यावा.

**रतन पाटील :-**

शाळा भाड्याने दिल्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

**गजानन भोईर :-**

ठराव पुन्हा आणा. ठराव हा ठराव असतो. सुचना आणल्या म्हणजे ठराव होत नाही.

**मा. सभापती :-**

त्याच्यामधील विषय आता बदलता येणार नाहीत.

**गजानन भोईर :-**

त्याच्यामधील विषय बदलता येणार नाही, मग तुम्ही तसे सांगा.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे त्या दिवशी मा. आयुक्त साहेब आलेले होते.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील आम्हाला मा. आयुक्त साहेब या सभेमध्ये निर्देश देऊ शकत नाहीत. ते त्यांचे स्वतःचे मत मांडतील.

**मोहन पाटील :-**

मा. सभापतींनी दिलेल्या रुलिंगबाबत मी बोलत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, निर्देश देऊ शकत नाहीत. त्यामुळे तुम्ही मा. आयुक्तसाहेबांचा विषय घेऊ नका. सभेमध्ये संपूर्ण निर्णय मा. सभापती घेतात.

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्तसाहेबांनी आठ दिवसात निर्णय देण्याबाबत सांगितलेले होते.

**जयंत पाटील :-**

सभेमध्ये संपूर्ण निर्णय मा. सभापती देतात.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांनी रुलिंग दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

त्या ठिकाणी मा. सभापती राहत नाहीत, सन्मा. सदस्य मोहन पाटील राहत नाहीत, सन्मा. सदस्य एस. ए. खान तसेच या ठिकाणचे कोणतेही सन्मा. सदस्य त्या ठिकाणी राहत नाहीत. मी त्या मैदानाच्या बाजूला राहतो. आम्हाला रात्री एक वाजेपर्यंत झोप येत नाही. त्या ठिकाणी एवढा आवाज असतो. मी तिकडे आणि सभेतसुध्दा बोललो की, माझा विरोध मालवणी जत्रेला नाही. कारण त्याच्यामध्ये एक सांस्कृतिक असा वेगळा भाग आहे. तिकडच्या वस्तु इकडे आणून विकणे आणि तिकडच्या लोकांना रोजगार मिळणे हा त्याच्यामागचा उद्देश आहे. त्या ठिकाणी येणाऱ्या झुल्याचा प्रचंड आवाज येतो. शिवाय त्याच्या इंजिनचा आणि ते ज्या पध्दतीने चालतात त्याचा प्रचंड आवाज येतो. तुम्ही स्वतः तिकडे जाऊन बघा.

**गजानन भोईर :-**

त्यांनी तसा उल्लेख केलेला आहे आणि त्याच्यामध्ये अटी दिलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

दुसरी गोष्ट म्हणजे तुमचा ठराव झालेला आहे. तुम्ही ठराव बदलू शकत नाहीत. मा. आयुक्त साहेबांना ठराव माहिती नसेल कारण ते नवीन आलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

अटीमध्ये एक माणूस विरोध करीत नसून संपूर्ण स्थायी समिती त्या ठरावाला विरोध करित आहे. जर तुमच्या कोणाची तक्रार आली तर तुमचा परवाना रद्द केला जाईल असे अटीमध्ये लिहिलेले आहे. संपूर्ण स्थायी समिती त्या ठरावाला विरोध करत असेल तर तुम्ही याच्यावर योग्य तो निर्णय द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या दिवशी तो ठराव परत आणण्याचा आणि फेर ठराव करायचा असे ठरले होते. म्हणजे तो विषय पुन्हा आणून त्या विषयावर चर्चा करायची आणि नंतर करायचा असे ठरले होते.

**गजानन भोईर :-**

म्हणजे आम्ही केलेल्या ठरावाला काही किंमत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर शाळेच्या मैदानाबाबतचा विषय होता.

**गजानन भोईर :-**

ते शाळेचे मैदान नसुन शाळेचे कंपाउन्ड आहे.

**मा. सभापती :-**

या ठरावामध्ये मैदान असा उल्लेख आहे.

**एस. ए. खान :-**

आपण ते चेंन्ज करायचे ठरलेले होते.

**गजानन भोईर :-**

ते शाळेचे मैदान आहे. पहिले बघा नंतर बोला.

**रतन पाटील :-**

ते सुभाषचंद्र बोस मैदानासारखे मैदान नसुन शाळेचे मैदान आहे.

**मोहन पाटील :-**

त्या दिवशी हा विषय झालेला होता. सन्मा. सदस्य रतन पाटील तुम्ही नाण्यांच्या दोन बाजुबद्दल बोलतात. परंतु, या नाण्याच्या दोन बाजु नाहीत. आपण असे ठरविलेले होते की, हा विषय पुढच्या वेळेला आणावा आणि शाळेचे मैदान किंवा जे काही असेल ते क्लिअर करावे.

**रतन पाटील :-**

शाळेच्या व्यतिरिक्त त्या मैदानाला बघु नका. ते शाळेचे मैदान असल्यामुळे ते मैदान शाळेच्या नावाने असावे.

**मोहन पाटील :-**

परंतु, तो विषय परत आणण्याचे रुलिंग दिलेले होते.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलतात ते बरोबर आहे की हा विषय पुढच्या मिटिंगला स्पेसिफिकली आणावा.

**कैलासबेन जानी :-**

हा विषय पुन्हा आणायला पाहिजे होता.

**गजानन भोईर :-**

तुम्ही हा विषय या मिटिंगला का घेतला नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय प्रशासनाने आणला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

नवघर शाळेचा विषय पुढच्या मिटिंगला घेतला जाईल असे रुलिंग देण्यात यावा.

**गजानन भोईर :-**

पुढच्या मिटिंगला विषय आणलेला चालणार नाही. याला काय अर्थ आहे? आजच फैसला करायचा.

**एस. ए. खान :-**

आज फैसला करु या.

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेचे मैदान चालू वेळेत भाडयाने दिले जाईल असा निर्णय घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर मागच्या मिटिंगला मैदान असा विषय होता. म्हणून तो विषय पुढच्या मिटिंगला ठेवण्यात आलेला होता.

**गजानन भोईर :-**

ही पुढची मिटिंग होती.

**रतन पाटील :-**

साहेब, ते मैदान म्हणजे मैदान नाही. ते शाळेचे मैदान आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय वाचून बघितला का? हा विषय स्पेसिफिकली लिहिलेला नाही.

**गजानन भोईर :-**

तुम्ही विषय वाचा.

**रतन पाटील :-**

साहेब, त्यात वेगळे काय आहे? मी शाळेच्या कंपाउन्डबद्दल बोलतो ते काही वेगळे नाही.

**गजानन भोईर :-**

मी तुम्हाला सन २००४ चा ठराव देतों. या मैदानाबाबत सन २००४ मध्ये शाळा क्रं. १३ चे मैदान शाळेच्या कालावधीत भाड्याने देउ नये असा ठराव झालेला होता, त्यावेळेला तुम्ही नव्हते.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, शाळा सुरु असताना त्या शाळेचे मैदान भाड्याने द्यायला पाहिजे का? ते भाडे मिळाल्यावरच आपली महापालिका चालणार आहे असा प्रकार आहे का?

**मा. सभापती :-**

तसा प्रकार नाही.

**केशव घरत :-**

मग शाळा चालू असताना शाळेचे मैदान भाड्याने कसे दिले जाते? ज्या दिवशी शाळा बंद असेल त्या दिवशी शाळेचे मैदान भाड्याने देणे योग्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. आणि शाळेच्या जवळ राहणाऱ्या सन्मा. सदस्यांनी त्यांची अडचण या ठिकाणी नमुद केलेली आहे. या ठिकाणी आलेली चर्चा आणि यापूर्वीच्या सभेमध्ये मा. सभापती साहेबांनी दिलेले रुलिंग आहे. आज या ठिकाणी मा. आयुक्तसाहेब हजर नाहीत आपण हा कला महोत्सव असल्याचे मान्य केलेले आहे. आपल्या संपूर्ण संस्कृतीचे जतन होण्याच्या उद्देशाने त्या ठिकाणी ते आयोजीत करण्यात आलेले आहे. कदाचित यापूर्वी या सभागृहाने जे ठराव केलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

साहेब, तुम्ही विषय बदलत आहात. ह्या लोकांनी ते मैदान चक्रवाले वगैरेना भाड्याने दिलेले आहे. त्याच्यामध्ये पाळणेवालेसुध्दा आहेत. तुम्ही कोकण महोत्सवाबाबत बोलता.

**एस. ए. खान :-**

मागच्या वेळेला कोकण महोत्सव चालू होता.

**गजानन भोईर :-**

झुले वगैरे कुठे लागणार आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सदरचे मैदान भाड्याने देऊ नये किंवा शाळेला गैरसोय होऊ नये हा आपला ठराव कायम आहे. आपण या ठरावाची अंमलबजावणी कटाक्षाने करणे अपेक्षीत आहे. परंतु, विशेष बाब म्हणूण मागच्या सभेत तसा काही निर्णय झाला असेल तर मा. आयुक्तसाहेबांबरोबर चर्चा करुन या ठिकाणी ठरल्याप्रमाणे आम्ही पुढच्या बैठकीत याचा अहवाल सादर करु.

**गजानन भोईर :-**

पुढच्या बैठकीत अहवाल सादर करेपर्यंत आपण शाळा बंद ठेवूया.

**एस. ए. खान :-**

शाळा बंद कशाला ठेवायची? आता महोत्सव संपलेला आहे.

**गजानन भोईर :-**

महोत्सव संपलेला नाही. अजून एक महिना आहे. महोत्सव संपला तर पाळणे तिथेच का आहेत? शाळेचे मैदान एक महिन्यासाठी भाड्याने दिलेले आहे. तुम्ही त्याचे काय करणार?

**रतन पाटील :-**

त्या मैदानात पाळणे नको आहेत असे तुम्ही ठरावात नमुद करा. कारण पाळण्याचा फार कर्कश आवाज येतो.

**जयंत पाटील :-**

आपण सांस्कृतिक कार्यक्रम असल्याचे बोलतो. परंतु, त्याच्यासाठी पाळण्याची काय गरज आहे? ते पाळणे लावणाऱ्यांच्या कोकण महोत्सवाशी काही संबंध नाही.

**गजानन भोईर :-**

कोकण महोत्सव संपलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा वेगळा विषय आहे.

**जयंत पाटील :-**

पाळणे लावणारा कोकणातील नाही. त्याची बाजु घेणारी बरीच लोक इकडे बसलेली आहेत.

**मा. सभापती :-**

त्या मैदानातील पाळणे काढलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

मैदानातले पाळणे अजूनपर्यंत काढलेले नाहीत. आपण आता बघायला जाऊया.

**गजानन भोईर :-**

त्या मैदानातील पाळणे अजूनपर्यंत काढलेले नाहीत.

**मा. सभापती :-**

काल शेवटचा दिवस होता. त्यामुळे पाळणे काढलेले असतील. आम्ही आज १२ वाजेपर्यंतची वेळ दिलेली आहे. त्या वेळेमध्ये पाळणे काढले नाही तर त्या लोकांना भाडे भरायला लागेल.

**गजानन भोईर :-**

आपल्याला भाडे नको आहे. जर ते पाळणे काढले नाही आणि आपण त्यासाठी भाडे लावले तर ते लोक ते पाळणे महिनाभर ठेवतील. ते तुम्हाला एक महिन्याचे भाडे देतील.

**रतन पाटील :-**

तुम्ही पाळणे जप्त करा.

**जयंत पाटील :-**

आमचा विरोध कोकण महोत्सवाला नाही.

**गजानन भोईर :-**

ज्या लोकांनी आज पाळणे काढले नसतील, त्यांनी पाळणे काढावेत. आम्हाला पाळण्याचे भाडे नको आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही त्यांना पाळणे वगैरे काढायला सांगा.

**गजानन भोईर :-**

आज आपल्या अधिकाऱ्यांना तिथे पाठवा आणि ते झुले वगैरे काढायला सांगा.

**मा. सभापती :-**

जर पाळणे वगैरे काढले नसतील तर ते पाळणे ताबडतोब महानगरपालिकेच्यामार्फत काढले जातील.

**गजानन भोईर :-**

ते पाळणे आजच्या आज संध्याकाळी काढून टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, अजून एका मालवणी जत्रेला महापालिकेने दि. १४ नोव्हेंबर ते दि. २१ नोव्हेंबरपर्यंत परवानगी दिलेली आहे. आता डिसेंबर महिना आलेला आहे. परंतु, त्या दिलेल्या परवानगीचे काय?

**ग्रिटा फॅरो :-**

ते कॅन्सल करा.

**गजानन भोईर :-**

कॅन्सल कशाला करायचे? आपल्या महापालिकेला पैसे मिळतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे हे बी.जे.पी.चे काम आहे असे वाटते.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना अशी परवानगी देऊ नका. परवानगी देण्याचे काम महानगरपालिकेकडे, मुख्यालय किंवा आयुक्तसाहेबांकडे द्या. प्रभाग अधिकाऱ्यांकडे देऊ नका.

**जयंत पाटील :-**

मालवणी जत्रेमध्ये कुठल्याही तऱ्हेचे झुले लावता कामा नये असे तुम्ही ठरावात नमुद करा.

**रतन पाटील :-**

कुठल्याही तऱ्हेचे पाळणे लावायचे नाही असे नमुद करा.

**केशव घरत :-**

परंतु, शाळा सुरु असताना शाळेचे मैदान भाड्याने देऊ नये.

**सुर्यकांत भोईर :-**

शाळा सुरु असताना शाळेचे मैदान भाड्याने देऊ नये. जिथे शाळा नाही ती मैदाने भाड्याने द्या.

**मिलन पाटील :-**

शाळा सुटल्यानंतर म्हणजेच सहा वाजल्यानंतर ती जत्रा भरली पाहिजे. ही मुख्य अट आहे.

**गजानन भोईर :-**

शाळेच्या मैदानात जत्रोत्सव नको.

**केशव घरत :-**

शाळा सुरु असताना जत्रा काय करायची आहे?

**गजानन भोईर :-**

शाळा सुरु असतानासुध्दा ते झुले वगैरे तिथेच असतात. जत्रा संध्याकाळीच असते.

**मा. सभापती :-**

शाळेच्या वेळेला या जत्रोत्सवामुळे अडचण होते का?

**गजानन भोईर :-**

आपल्याला ते मैदान भाड्याने द्यायचे नाही. तुम्ही शाळा बंद असताना कसलीही परमिशन द्या.

**मा. सभापती :-**

तुम्हाला ती परमिशन शाळेच्या वेळेत नको आहे तर ठिक आहे.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आमच्या घोडबंदरमधील एका व्यक्तीचा के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये मृत्यु झालेला होता. त्या व्यक्तीचा दहन दाखला घेण्यासाठी आम्ही एका व्यक्तीला प्रभाग ऑफिसला पाठवले. ती व्यक्ती झेरॉक्स पेपर घेऊन प्रभाग ऑफिसला गेली. प्रभाग ऑफिसच्या कर्मचा-यांनी त्याला उत्तर दिले की, तुम्ही ओरिजनल आणत नाही तोपर्यंत दाखला दिला जाणार नाही. मी त्यांना फोन करुन सांगितले की, मी ओरिजनल दाखला नंतर पाठवतो. परंतु, तुम्ही सध्या या व्यक्तीकडे दहन दाखला द्या. म्हणजे नगरसेवकांचा काहीही मानसन्मान नाही का? मी मिरारोड म्हणजे प्रभाग क्र. ४ मध्ये त्या माणसाला दहन दाखला आणायला पाठविलेले होते.

**मोहन पाटील :-**

त्या लोकांना झेरॉक्सवरुन ओरिजनल शोधता आले असते.

**केशव घरत :-**

मी त्यांना ओरिजनल दाखला आणूण देतो असे सांगितले होते. ती लोक त्या माणसाची बॉडी घेऊन गेले होते. म्हणूण मी बोललो की, मी लगेच तुम्हाला दाखला पाठवून देतो. परंतु, ते नाही बोलले. मग आम्ही लेटर दिले तर त्याचा काहीही उपयोग नाही. पुन्हा हा असाच प्रकार होणार आहे.

**रतन पाटील :-**

जर एखाद्या नगरसेवकाने सांगितले तर त्यांनी ऐकायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

आता त्या कर्मचा-यांना सक्त वॉर्निंग देण्यात येईल.

**केशव घरत :-**

या ठिकाणी जन्म-मृत्यु विभागाचे अधिकारी हजर आहेत का?

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही जन्म-मृत्युच्या अधिका-यांना बोलवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता मा. सभापती महोदयांनी रुलिंग दिल्यानंतरसुध्दा अशा घटना घडल्यानंतर ते नागरिक साहजिकच आपल्याकडे येतात.

**केशव घरत :-**

साहेब, याची अंमलबजावणी होत नाही. हा आमचा अनुभव आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही याबाबतच्या सुचना संबंधित अधिका-यांना देऊ आणि तुम्हाला यापुढे गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता पुन्हा डिसेंबर महिन्यामध्ये मालवणी जत्रोत्सव आहे. त्याचा काय निर्णय झाला?

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, या मालवणी जत्रोत्सवाला शाळा चालू असताना परमिशन द्यायची नाही. त्याची परवानगी घेण्याचे काम प्रभाग समितीला न देता महानगरपालिकेला द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याबाबत मा. आयुक्त साहेबांशी चर्चा झालेली आहे. या जत्रोत्सवाचा शाळेवर परिणाम होणार नाही आणि तुमचा हा ठराव अंमलबजावणीसाठी राहील. जर फार निकडीच्या परिस्थितीमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम असतील किंवा तेथील पटांगण चांगले असेल आणि त्याचा शाळेवर काहीही परिणाम होत नसेल तर मा. आयुक्तसाहेबांच्या मान्यतेनुसार त्याच्यावर निर्णय घेतला जाईल.

**जयंत पाटील :-**

चक्रांना कुठल्याही परिस्थितीत परवानगी द्यायची नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जिथे शाळा असेल तिथे तुम्ही जत्रोत्सवाला परवानगी देऊ नका. परंतु, सुभाषचंद्र मैदानावर जत्रोत्सवासाठी परवानगी द्यावी.

**जयंत पाटील :-**

या चक्रांना अनेक परवानग्या लागतात. परंतु, त्या लोकांनी कुठल्याही त-हेची परवानगी घेतलेली नाही. ते प्रचंड उंच म्हणजे पाच मजल्याची उंची आहे. उद्या जर एखादा उपघात झाला असता तर त्याची जबाबदारी कोणी घेतली असती?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या परवानगीनंतर ते पोलिस डिपार्टमेन्ट आणि इतर डिपार्टमेन्टची परवानगी घेऊनच झुले वगैरे लावतात.

**जयंत पाटील :-**

त्या लोकांनी फायर ब्रिगेड आणि पोलिस डिपार्टमेन्टची परवानगी घेतलेली नाही. उद्या एखादा अपघात झाला तर आपली म्युनिसिपल कार्पोरेशन जबाबदार राहील.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती महोदय, चार वर्षापूर्वी निर्मल यात्रेमध्ये असा अपघात झालेला होता. त्या अपघातात सहा-सात माणसे मेलेली होती. तुम्हाला त्याची कल्पना असेल. निर्मलमध्ये तो पाळणा संपूर्णपणे तुटून माणसे मेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण परवानगी देणार. त्यानंतर ते इतर परवानग्या घेणार.

**जयंत पाटील :-**

माझ्या महितीनुसार त्यांनी कुठल्याही त-हेची परवानगी घेतलेली नाही.

**गजानन भोईर :-**

आपण परवानगी द्यायचीच नाही.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती महोदय, प्रत्येक प्रभाग समितीचे अधिकारी स्थायी समितीला आले पाहिजेत असा तुम्ही आदेश काढा. चार अधिकारी आहेत. मा. सभापती साहेब, तुम्हाला चार अधिका-यांना आदेश काढण्याचा अधिकार असला किंवा नसला तरी फक्त स्थायी समितीची सभा जेव्हा असते तेव्हा त्या चार प्रभाग अधिका-यांनी हजर रहायला पाहिजे. तुम्हाला बोलावले जाणार नाही. आता प्रभाग अधिकारी हजर असते तर त्यांनी उत्तर दिले असते. म्हणूण तुम्ही स्थायी समितीच्या सभेला प्रभाग अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. चारही प्रभागाचे अधिकारी हजर पाहिजेत.

**केशव घरत :-**

आता प्रभाग अधिकारी हजर असते तर उत्तर दिले असते.

**गजानन भोईर :-**

प्रभाग अधिका-यांनी कुठलीही परमिशन देताना मुख्यालय, आयुक्त किंवा सचिवांच्या कानावर घातले पाहिजे. याचे ठराव असतात किंवा काय असते याची त्यांना काहीही माहिती नसताना तिथल्या तिथे परमिशन देणे चुकीचे असते.

**मिलन पाटील :-**

काहीही साधल जात नाही. स्थायी समितीच्या सभेच्या वेळेला प्रभाग समिती सभेच्यासुध्दा मिटींग असतात. मुख्यालयांनी त्यांना सांगायला पाहिजे. कारण हे मुख्यालयाचे काम आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुमच्या सुचनेची दखल घेऊन त्याच्यावर अंमलबजावणी केली जाईल.

**मिलन पाटील :-**

स्थायी समितीच्या मिटींगच्या वेळेला प्रभाग समितीची मिटींग घ्यायची नाही.

**एस. ए. खान :-**

समजा, कोणाचाही अचानक मृत्यु झाला तर त्यासाठी नगरसेवकाकडे पत्र देण्याची प्रोसिजर आहे. आम्हाल जर संशय वाटला तर आम्ही परत पाठवतो. तर तो माणूस दुस-या कुठल्या तरी सोशल वर्करचे पत्र घेतो आणि मग तो दफन दाखला घेतो. कोणीही सोशल वर्कर किंवा कुठल्याही पर्टीक्युलर पार्टीच्या लोकांनी हा माणूस मेलेला आहे असे आपल्या लेटरवर लिहून दिले तर त्यांना दाखला देतात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. याचीसुध्दा प्रोसिजर आहे. जन्म आणि मृत्युची नोंद त्या रजिस्टर ऑफिसरला एव्हिडन्स आल्यानंतर ते अपेक्षीत कागदपत्र तपासुन घेतली जाते. कधी कधी आपल्याकडे अनावधानाने पत्राची शिफारस घेतली आणि चुकीची नोंद निघाली तर ते सन्मा. सदस्य आणि प्रशासनालासुध्दा भविष्यामध्ये वेगळ्या प्रॉब्लमला सामोरे जाण्याची स्थिती निर्माण होते. म्हणूण शक्यतो अधिकारी त्याच्यामध्ये काळजी घेतात. कारण त्याच्यामध्ये समन्वय ठेऊन आपली गैरसोय होणार नाही असे कामकाज करण्याची आम्ही सुचना देऊ.

**एस. ए. खान :-**

आम्हाला कधी-कधी संशयित असल्याचे वाटते म्हणूण आम्ही दाखला देत नाही. तर ते बोलतात हे दाखला देत नाहीत, ते दाखले देत नाहीत. हे कायदेशीरित्या योग्य आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कधी-कधी आपल्यालासुध्दा फसवले जाते. कारण त्याच्यामध्ये खुप मोठे एल.आय.सी.चे मॅटर्स असतात.

**एस. ए. खान :-**

समजा, तो माणूस नगरसेवकाकडे आला आणि नगरसेवकाकडे दहन दाखला मिळाला नाही तर तो माणूस सोशल वर्करकडे जाणार हे कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे का? दुसऱ्या कुठल्या पार्टीच्या लोकांनी पत्र दिले तर त्याला दाखला मिळतो.

**मा. सभापती :-**

ज्या वेळेला समोरचा माणूस अधिकाऱ्याकडे जातो तेव्हा तो सांगत नाही की, मी नगरसेवकाकडे जाऊन आलेलो आहे. तो त्याचे काम तिथल्या तिथे करतो.

**एस. ए. खान :-**

हे बरोबर नाही. त्या माणसाने पोस्टमार्टमसाठी डॉक्टरचे सर्टीफिकेट घ्यायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती प्रोसिजर नोंदणीमध्ये येते.

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये नोंदणीचा प्रश्न येत नाही. समजा दहन किंवा दफन करण्यासाठी तात्पुरते सर्टीफिकेट लागते, ते सर्टीफिकेट त्याच्यामध्ये मिळते म्हणजे दहन आणि दफनसुध्दा होते. आता कोणीही सर्टीफिकेट देण्याची प्रोव्हिजन आहे का? समजा एखादा माणूस मेला तर आम्ही त्याला विचारतो, त्याला कसला आजार होता. समजा, यांनी कॅन्सरबाबत सांगितले तर आज कॅन्सर होऊन माणूस दुसऱ्या दिवशी मरत नाही. मी त्याला सांगतो कॅन्सरचे पेपर घेऊन या. टी.बी. झाला असेल तर टी.बी.चे पेपर घेऊन या. ते इकडचे तिकडचे सांगतात. तेव्हा आम्हाल ते बरोबर नसल्याचा संशय येतो. मग तो माणूस दुसऱ्या पार्टीच्या सोशल वर्करकडे जातो. त्या पार्टीचा माणूस नगरसेवक नसतानासुध्दा लिहून देतो. त्याच्यावरुन त्या माणसाला दफन दाखला मिळतो. तो माणूसच अधिकाऱ्याला सांगतो की, आम्हाला सोशल वर्करने दफन दाखला दिला. परंतु, नगरसेवकांनी दिला नाही. आम्हाला संशय वाटतो म्हणून आम्ही देत नाही. आम्ही त्या माणसाकडे कागदपत्र मागतो. समजा, एखादा चुकीने दहन दाखला दिला म्हणजे समजा कोणाला गळा दाबुन मारले, विष पिऊन मेला किंवा काय झाले? पुढे-मागे पोलिस केस झाली तर दाखला देणारा माणूस जबाबदार राहणार आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, एकदा मृत्यु झाला तर डॉक्टरसुध्दा सर्टीफिकेट देत नाहीत. त्यावेळेला नगरसेवक किंवा एखाद्या सक्षम अधिकाऱ्याचे ओळखपत्र लागते.

**मा. सभापती :-**

आपल्या इथे सगळी गावे आहेत.

**एस. ए. खान :-**

साहेब, मी दोन-तीन केस परत केल्या. नंतर त्याची चाचणी करण्यात आली. एकजण विष प्यायलेला होता. एकाला रात्री मारले होते. माझ्याकडे असे तीन मॅटर आलेले होते. मी तिघांना परत केले होते.

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामध्ये महत्वाची बाब अशी आहे की, सन्मा. सदस्य एस. ए. खान हे वकील आहेत. त्यामुळे ते या पॉईन्टवर लिगली बोलत आहेत.

**एस. ए. खान :-**

मी लिगल पॉईन्टवर बोलणारच.

**जयंत पाटील :-**

लिगल पॉईन्टवर बोलायला पाहिजे. मा. आयुक्तसाहेब, या शहरात सात लाख लोकवस्ती आहे. आणि ८४ नगरसेवक आहेत. डॉक्टरचे सर्टीफिकेट डॉक्टरने दिलेले आहे. त्यामुळे नगरसेवकांचे पत्र पाहिजे अशातला भाग नाही. डॉक्टरांनी सर्टीफिकेट दिले म्हणजे डॉक्टर इज रिस्पॉन्सिबल फॉर दॅट. नगरसेवक रिस्पॉन्सिबल नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, यांचे म्हणणे तसे नाही. सन्मा. सदस्य एस. ए. खान यांचे असे म्हणणे आहे की, नगरसेवकांनी दिलेले पत्र स्विकारत नाही आणि सोशल वर्कसने दिलेले पत्र स्विकारतात.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरसेवकांनी पत्र द्यायला पाहिजे आणि सोशल वर्करने पत्र देऊ नये. याची आवशक्ता नाही.

**जयंत पाटील :-**

प्रत्येक पक्षामध्ये समाजसेवक आहेत आणि त्यांना पत्र देण्याचा अधिकार आहे आणि ते जबाबदार राहतील. परंतु, ते कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाहीत. महापालिकेचा सरकारी अधिकारी जो पत्र देईल तो त्या गोष्टीला जबाबदार राहील. समजा, मी जागेवर नाही तर त्या माणसाने कुठे जायचे?

**रतन पाटील :-**

ज्या फॅमिलीच्या माणसाचा मृत्यु झालेला आहे. त्या फॅमिलीचा तिथे पंचनामा करावा लागतो. त्या फॅमिलीमध्ये जे मेंबर्स असतील त्यांच्या सह्या घ्यायला लागतात. आणि ते पत्र इथे सबमिट करावे लागते. ते पत्र मी लोकप्रतिनिधी या नात्याने दिले म्हणून मी त्याला जबाबदार नाही. त्याच्या घरातील जेवढे मेंबर्स आहेत त्यांनी ते पत्र सही करुन द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

तो लेटर देणाऱ्याचा लूकआऊट आहे. असे कसे होणार?

**रतन पाटील :-**

साहेब, असेच व्हायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

हे सगळे होऊन गेलेले आहे. आमची या क्षेत्रात बरीच वर्षे गेलेली आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही हे हसण्यावर नेऊ नका. हा मुद्दा पाहिजें.

**मा. सभापती :-**

तुम्हाला वाटते तर तुम्ही त्या लोकांच्या घरात किंवा कुटूंबियांची सही घ्यायची आहे. हे तुमच्या सगळ्या पार्टनर लोकांचे काम आहे.

**रतन पाटील :-**

साहेब असा मुद्दा घ्यायचा आहे असे मी बोलतो. मी काय बोलतो ते समजून घ्या. मेलेल्या माणसाच्या घरातील व्यक्तींची सही घेण्याचा मुद्दा मी सांगत आहे.

**मा. सभापती :-**

एखादा गुजराथी माणूस मेला आणि त्याची फॅमिली गुजराथला असली तर आपण त्याच्या कुटूंबियांची सही घ्यायला गुजराथला जाणार का? पुढचा विषय घेण्यात यावा.

**मोहन पाटील :-**

या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे.

**रतन पाटील :-**

पुढच्या विषयावर नंतर चर्चा करा. परंतु, जे वारस असतील किंवा त्या मृत व्यक्तीचे जे फॅमिली मेंबर असतील त्यांच्या सह्या होणे आवश्यक आहे. समजा, मी सही दिली किंवा तुम्ही सही दिली तर तुम्ही आणि मी त्यांच्या फॅमिली मेंबर्स ऐवढे जबाबदार नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याला ती व्यक्ती बेवारस आहे असाच विचार करायचा आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही असा का विचार करता? आम्हाला प्रत्येक वेळेला सर्टीफिकेट द्यावे लागते. आम्ही बेवारस प्रेताचेसुध्दा सर्टीफिकेट देतो. मग त्याला आम्ही जबाबदार आहोत का?

**डॉ. रमेश जैन :-**

अगर कोई व्यक्ती मर गई तो डॉक्टरका सर्टीफिकेट लगता है। अगर डॉक्टरको कोई डाऊट लगता है।

**मा. सभापती :-**

जर डॉक्टरांना डाऊट आला तर डॉक्टर सर्टीफिकेट देत नाहीत.

**रतन पाटील :-**

साहेब, डॉक्टर सर्टीफिकेट देत नाहीत म्हणूण आम्हाला बोलावे लागते.

**डॉ. रमेश जैन :-**

उस टाईम सोसायटीका चेअरमन या फिर सोसायटीकी भी जिम्मेदारी रहती है।

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, एखादी व्यक्ती इथे मरण पावली आणि त्या व्यक्तीची बॉडी राजस्थानला न्यायची असेल आणि माझी सही नगरसेवक या नात्याने ग्राह्य धरली तर ते चांगले आहे की वाईट आहे ते सांगा.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील तुम्ही विषयाला वेगळे वळण देत आहात. मी फक्त एवढेच म्हटले की, उद्या एखादे प्रकरण आमच्यावर शेकले तर आम्ही काय करणार?

**मोहन पाटील :-**

आम्हाला ते कळते. परंतु, आपण पंचनामा करुनच सर्टीफिकेट देणार.

**रतन पाटील :-**

आता सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेब बोलले की त्यांना संशय आला म्हणूण त्यांनी सर्टीफिकेट दिले नाही म्हणूण त्या लोकांनी कार्यकर्त्यांचे सर्टीफिकेट घेतले.

**जयंत पाटील :-**

या महानगरपालिकेतील दोन अधिकारी गेलेले आहेत. एक डॉ. बावस्कर हे आरोग्य अधिकारी आणि एक विधी सल्लागार श्री. साळवे साहेब हे दोघे गेलेले आहेत. त्यांच्या जागेवर कोण आले आहे का?

**रतन पाटील :-**

जवळजवळ पंधरा दिवसापासून डॉ. बावस्कर नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

महिना होऊन गेलेला आहे.

**मा. सभापती :-**

मागच्या मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे आपण विधी सल्लागाराची निवड करण्यासाठी निविदा मागितलेल्या आहेत. परंतु, कोणाच्याही निविदा आलेल्या नाहीत.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, या शहरातील अनेक प्रश्न कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. आपल्याला एखाद्या तांत्रिकाचा कायदेशीर सल्ला लागला तर त्याची जबाबदारी कोणावर आहे? आज त्याच्यासाठी कोण जाबाबदार आहे? तुम्ही वकील नेमणार त्यांचे नांव काय आहे? तुम्हीसुध्दा वकील होते मग तुम्हाला सल्लागाराची काय आवशक्ता आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदय, या ठिकाणी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने खुलासा करतो की, डॉक्टरांच्या पदाचा चार्ज कार्यरत उपायुक्त श्री. शेख साहेबांकडे दिलेला आहे. आपण विधी अधिका-यासाठी ॲड देऊन प्रस्ताव सांगितलेले आहेत. त्याप्रमाणे दोन प्रस्ताव आलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

साहेब, मधल्या काळात कोण बघत होते? ह्यांचे मिनिट येईल. आपण त्याला मंजूरी देऊ. तो वेगळा विषय आहे. परंतु, या मधल्या गॅपमध्ये कोण वकील आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मधल्या काळात विधी अधिकारी नसल्यामुळे आपण चार्ज दिलेला नाही. परंतु, आपले जे विधी तज्ञ श्री. मोदगी किंवा श्री. आपटेसाहेब आहेत. आपण त्यांच्योडून अभिप्राय घेऊन कार्यवाही केली जाते. विधी अधिका-याचे पद तात्काळ भरण्यासाठी दोन प्रस्ताव आलेले आहेत. त्यांनी त्याच्यामध्ये अनुरोध नमुद केलेले नाही. ते त्यांच्याकडून तात्काळ घेऊन पुढील सभेपूर्वी सादर केले जाईल.

**जयंत पाटील :-**

आरोग्य आणि विधी सल्लागारांचे असे दोन्ही सादर करणार का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आरोग्याचा चार्ज उपायुक्तांकडे आहे. त्यामुळे ती कार्यवाही नंतर पूर्ण केली जाईल.

**जयंत पाटील :-**

उपायुक्तांकडे अतिरिक्त चार्ज जाऊ द्या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५२ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

आम्हाला काल संध्याकाळी प्रोसिडिंग मिळाली. प्रोसिडिंग आली तेव्हा आम्ही घरात नव्हतो. आणि सकाळी वाचू शकलो नाही. आम्ही प्रोसिडिंगला पुढच्या सभेला मान्यता देऊ.

**रतन पाटील :-**

प्रोसिडिंग मंजूरीचा विषय पुढच्या मिटींगला घेण्यांत यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही प्रोसिडिंग वाचलेले नाही.

**कैलासबेन जानी :-**

प्रोसिडिंग प्रत्येक महिन्याला द्यायला पाहिजे. तुम्ही तीन-तीन महिन्यांचे प्रोसिडिंग देतात.

**एस. ए. खान :-**

सध्या प्रोसिडिंगमध्ये शाळेचा मुद्दा महत्वाचा आहे. सध्या या विषयावर चर्चा होणे महत्वाचे आहे.

**गजानन भोईर :-**

आम्हाला प्रोसिडिंग काल संध्याकाळी मिळाली. मग आम्ही कसे वाचणार?

**सुर्यकांत भोईर :-**

ह्या प्रोसिडिंगमध्ये शाळेचा मुद्दा महत्वाचा आहे.

**मोहन पाटील :-**

प्रोसिडिंगमध्ये फक्त ग्रॅमॅटिकल मिस्टेक बघितल्या जातात. प्रोसिडिंग वाचण्याचा प्रश्न येत नाही. आणि जो धोरणात्मक असा झालेला निर्णय असेल तो निर्णय येतो. तुम्ही फक्त ग्रॅमॅटिकल मिस्टेक सांगायच्या असतात.

**जयंत पाटील :-**

आपण ग्रॅमॅटिकल मिस्टेक सुधारण्यासाठी विषय आणतो.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगला घ्या.

**रतन पाटील :-**

प्रोसिडिंग मंजूरीचा विषय पुढच्या मिटींगला घ्या. आम्हाला काही वाचायला आणि बघायला मिळाले नाही.

**गजानन भोईर :-**

पान क्र. ३ वर शाळांना अनुदान देण्याबाबतचा विषय आहे. मला त्या विषयाबाबत बोलायचे आहे. आपण शाळांना जे अनुदान दिलेले आहे. त्यांचे सर्व कागदपत्रे तपासुन हे कायदेशीररित्या झालेले आहे का? म्हणजेच या सर्व शाळेवाल्यांची कागदपत्रे तपासलेली आहेत का?

**मोहन पाटील :-**

प्रथम प्रोसिडिंग पूर्ण होऊ दे. नंतर या विषयावर चर्चा करुया.

**केशव घरत :-**

ठराव क्र. १८६ चे राष्ट्रीय महामार्ग क्र.८ येथे फाऊन्टन हॉटेल समोरील चौक या विषयाचे काय झाले?

**प्र. सचिव :-**

राष्ट्रीय महामार्गाचा ठराव झालेला आहे. आणि मंजूर होऊन सही होऊन आलेला आहे.

**केशव घरत :-**

साहेब, हे प्रकरण महासभेला झालेले होते.

**प्र. सचिव :-**

आपला इकडचा ठराव महासभेला गेलेला आहे.

**केशव घरत :-**

राष्ट्रीय महामार्गाचे प्रकरण महासभेच्या इकडे आलेले आहे. कारण यापूर्वीच्या स्थायी समितीला या विषयावर चर्चा झालेली नव्हती. वाटल्यास तुम्ही चेक करा.

**प्र. सचिव :-**

तुम्ही विषय काय आहे तो सांगा?

**केशव घरत :-**

नं. १८६ राष्ट्रीय महामार्ग क्र.८ येथे फाऊन्टन हॉटेल समोरील चौक.

**दिपक खांबित :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र.८ फाऊन्टन हॉटेल समोरील चौकबाबतचा ठराव स्थायी समितीमध्ये झालेला होता.

**मोहन पाटील :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र.८ फाऊन्टन हॉटेल समोरील चौकबाबतचा ठराव स्थायी समितीमध्ये झालेला आहे.

**केशव घरत :-**

या विषयाचा ठराव स्थायी समितीमध्ये त्या त्या विभागातील नगरसेवकांनी केलेला आहे. सन्मा. सदस्य गजानन भोईर यांचे ठराव मंजूर झाल्याबद्दलचे वाक्य आहे. मी तुम्हाला ते वाक्य दाखवू का?

**मोहन पाटील :-**

तुम्ही सन्मा. सदस्य गजानन भोईर यांचे वाक्य दाखवा. परंतु, आपण तो विषय या ठिकाणी मंजूर करुन स्थायी समितीने शिफारस केलेली आहे.

**केशव घरत :-**

हा विषय पूर्वी आलेला आहे.

**मोहन पाटील :-**

परंतु, आपण हाच ठराव केलेला आहे.

**केशव घरत :-**

तुम्ही मागच्या वेळेला बोलले होते की, जनार्दन गौरी साहेबांबद्दल सगळ्यांना आस्था आहे. मग घोडबंदर रोडला दोन पॉईन्ट आहेत. त्यामधील एक वेगळा पॉईन्ट त्यांना द्या. हा विषय महासभेत होता. हा विषय स्थायी समितीमध्ये आलेला नव्हता.

**मोहन पाटील :-**

हा स्थायी समितीचा विषय आहे. परंतु, या विषयाची महासभेला शिफारस केलेली होती.

**केशव घरत :-**

हा विषय पूर्वी स्थायी समितीला आलेला नव्हता.

**मोहन पाटील :-**

हा विषय स्थायी समितीमध्ये आलेला होता.

**केशव घरत :-**

आम्हाला त्या लोकांनी मदत केली. आता तुम्ही आम्हाला मदत करा. आम्ही बसतो तुम्ही रस्त्यावर उतरले नसाल. परंतु, आम्ही रस्त्यावर उतरुन मोठे झालेलो आहोत.

**मोहन पाटील :-**

आता त्या विषयाला अंतिम मंजूरी दिलेली आहे. आता जो ठराव आलेला आहे, आपण त्या ठरावाला स्थायी समितीमध्ये मंजूरी देऊन त्या ठरावाची महासभेत शिफारस केलेली आहे. त्याची चर्चा सुरु आहे आणि त्या विषयावर अंतिम निर्णय झालेला आहे. हे प्रोसिडिंग यायला वेळ लागला म्हणूण हे प्रोसिडिंग आता आणलेले आहे. त्यामुळे हा विषय आता वाचण्यात आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, पान क्र. २ आणि अनुक्रमांक ५ बाबत मी मागच्या वेळेला सुचना दिलेली होती की, मी गजानन रघूनाथ ठाकूरचे नाव द्यायला सांगितलेले होते. परंतु, त्याची अंमलबजावणी झालेली नाही आणि दुरुस्तीसुध्दा झालेली नाही. तुम्ही आता दुरुस्ती करुन देत असाल तरच मी या प्रोसिडिंगला मान्यता देतो.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, आम्हाला तुमची अमान्यता चालेल.

**मिलन पाटील :-**

आम्हाला या विषयाला मान्यता पाहिजे. कारण आम्ही दोन वेळा गव्हर्नमेन्टकडे हे दिलेले आहे.

**मोहन पाटील :-**

हा विषय महासभेत मंजूर झालेला आहे.

**मिलन पाटील :-**

माझे महासभेतसुध्दा ऑब्जेक्शन होते.

**मोहन पाटील :-**

आता तुमचे ऑब्जेक्शन राहू दे.

**मिलन पाटील :-**

आम्हाला रस्त्याचे नाव बदली करायचे होते. आम्ही नाव बदली करुन घेऊ असे तुम्ही रुलिंग दिलेले आहे. तुमचे स्थायी समितीमध्ये रुलिंग आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, जेव्हा एखादा विषय स्थायी समितीकडून महासभेकडे शिफारसीसाठी जातो तेव्हा त्या विषयाला महासभेने अंमित मंजूरी दिल्यानंतर आपण इथे काहीही करु शकत नाही.

**मिलन पाटील :-**

त्या वेळेलासुध्दा प्रस्ताव पाठविला नाही आणि आतासुध्दा पाठविलेला नाही.

**दिपक खांबत :-**

रस्ता नामकरणबाबत महासभेत जो ठराव झालेला आहे, तुम्ही तो ठराव बघून घ्या. महासभेचा ठराव फायनल आहे. हा ठराव फायनल नाही.

**मोहन पाटील :-**

ह्या ठरावाला दुरुस्तीचा प्रश्न येणार नाही.

**दिपक खांबित :-**

ह्या ठरावाला अर्थच नाही. महासभेमध्ये जो ठराव होईल त्या ठरावामध्ये करेक्शन व्हायला पाहिजे.

**केशव घरत :-**

जिथे लोकांचा विरोध असेल तिथे तुम्ही कसे देता? सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोलले की आम्ही रस्त्यावर उतरु परंतु आम्ही रस्त्यावर उतरुनच मोठे झालेलो आहोत. आम्हाला शिवसेनेने रस्त्यावरच उतरायचे शिकवलेले आहे. म्हणूण आम्ही मोठे झालो असे आम्ही सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांना बोललो असतो. परंतु, आम्हाला ते प्रकरण वाढवायचे नव्हते म्हणूण आम्ही गप्प बसलो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य केशव घरत या ठरावाला महत्व नाही. महासभेला जो ठराव होईल. त्या ठरावाला महत्व आहे.

**केशव घरत :-**

मी त्या वेळेलासुध्दा विरोध करुन मागणीपत्र दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

परंतु, हा ठराव फायनल केलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

पान क्र. १० वर माझ्या वाक्यामध्ये जे हिंदीमध्ये लिहलेले आहे ते काढून टाका. मी हिंदीमध्ये बोललो नव्हतो. त्याच्यानंतर किती बजेटमध्ये ऐवजी येणाऱ्या बजेटमध्ये असे पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पान क्र. १४ वर माझे वाक्य हिंदीमध्ये आहे ते काढून टाका.

**केशव घरत :-**

पान क्र. १३ वर चेसीची उघाडी ऐवजी चिळशीची उघाडी असे पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

पान क्र. १६ वर नवी दिल्ली पत्र टाकून वगैरे जे बोललेले आहे ते काढून टाका. कारण मी ते रागाच्या भरात बोललो असेन.

**केशव घरत :-**

पान क्र. १४ वर तो नाला छोटा ऐवजी मोठा असे पाहिजे. आणि खाली ती नाला न लिहता तो नाला पाहिजे.

**प्र. सचिव :-**

मी आता दुसऱ्या इतिवृत्तांताचे वाचन करतो.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही या ठिकाणी नवघर गाव कशाला गाळले आहे.

**मोहन पाटील :-**

दोन्ही समित्यांची कामे चालू आहेत. त्या समितीचे काम पूर्ण झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही ती कामे ठरवून पूर्ण केलेली आहेत ना.

**मोहन पाटील :-**

नवघर गावाचे काम पूर्ण केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझ्या ओमसाई अपार्टमेन्ट मधील पब्लिक चॅरिटेबल काम आहे. ते १ लाखाचे कामसुध्दा नमुद करुन घ्या.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी बोलल्यावर सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलतील की, तुम्हाला बोलण्याचा काहीही अधिकार नाही. परंतु, आपण जी अनुदाने विविध संस्था आणि विविध शाळांना दिलेली आहेत, मला त्याबाबत बोलायचे आहे की, मिरा भाईंदर महापालिकेच्या हद्दीतील ज्या महापालिकेच्या शाळा आहे, त्या शाळांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्या शाळांना प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. जे रु. १० हजार रु. १० हजार डोनेशन घेतात तुम्ही अशा कॉन्व्हेन्टच्या शाळांनासुध्दा अनुदान देण्यासाठी प्राधान्य दिलेले आहे. हे योग्य नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही मा. सभापतींना शाळांची नावे द्या.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी रु. २ लाख त्यांच्या प्रभागातील कामासाठी पाहिजे असे सांगितलेले होते. त्यांनी त्याबाबतचे लेटरसुध्दा दिलेले आहे. तुम्ही त्यांच्या प्रभागातील कामासाठी रु. २ लाख द्या आणि आपण या ठिकाणी जी अमाऊन्ट दाखवलेली आहे त्याच्यामधून ही अमाऊन्ट कमी करा. मला फक्त एवढेच सांगायचे आहे.

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेच्या शाळेत शिकायला येणारी मुले आदिवासी विभागातील आहेत. त्या मुलांच्या चप्पल नाही किंवा ती मुले पायामध्ये तुटलेली चप्पल घालतात. तुम्ही अशा शाळांना अनुदान देण्याऐवजी कॉन्व्हेन्टना अनुदान देणे चुकीचे आहे. साहेब, ह्या मुलांमध्ये असा भेद का करता?

**मा. सभापती :-**

हा विषय झालेला आहे.

**रतन पाटील :-**

विषय झालेला आहे असे तुम्ही कसे बोलता?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील हा विषय आमचा आहे. घोडबंदर, चेणा, या ठिकाणी आदिवासी वस्त्या आहेत.

**रतन पाटील :-**

आपल उघड ठेवायच आणि दुस-याच बघायचं अशी परिस्थिती झालेली आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर आणि सन्मा. सदस्य रतन पाटील या शैक्षणिक अनुदानाचा संबंध त्या शिक्षण फंडावर येत नाही. आपण या बजेटच्या अनुषंगाने अनुदान द्यायचे आहे. असा विषय आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी सक्षम होऊ दे. तुम्ही त्या विद्यार्थ्यांना चप्पल किंवा बुट द्या. ते विद्यार्थी उघड्या पायाने येतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

सहा महिने झाले तरी ड्रेस, चपला मिळत नाही.

**गजानन भोईर :-**

आमचा जो नगरसेवक निधी असतो, आम्ही त्या नगरसेवक निधीमधून महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना चप्पल देऊ शकतो का?

**मोहन पाटील :-**

नगरसेवक निधीमधून चप्पल देऊ शकतो असे मी पूर्वीच सांगितलेले आहे.

**गजानन भोईर :-**

मग आम्ही आमच्या नगरसेवक निधीमधून महापालिकेच्या विद्यार्थ्यांना चप्पल द्यायला तयार आहोत. नगरसेवक निधीतुन चप्पल द्यायला महानगरपालिका तयार होईल का?

**मा. सभापती :-**

तो तुमचा प्रश्न आहे. त्यामुळे तुम्ही महानगरपालिकेला पत्र द्या आणि विचारा.

**गजानन भोईर :-**

जर आपण नगरसेवक निधीमधून बुट किंवा चप्पल देऊ शकत नाही तर मग तुम्ही आपआपल्या फंडामधून त्या मुलांना बुट किंवा चप्पल द्या.

**रतन पाटील :-**

साहेब, ज्या शाळा रु. १० हजार - रु. १५ हजार डोनेशन घेतात, त्यांनासुध्दा तुम्ही अनुदान देत आहात. तुम्ही नक्की काय ठरविलेले आहे? तेच मला कळत नाही.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, नगरसेवक निधीमधून पैसे देण्याचे काही नियम आहेत.

**रतन पाटील :-**

आपल्याला नगरसेवक निधीतुन फन्ड घेऊन तो फन्ड महापालिकेच्या विद्यार्थ्यांना चप्पल किंवा बुटसाठी वापरु शकतो का? त्याचे उत्तर लेखा परिक्षकांनी द्यावे.

**गजानन भोईर :-**

आपण नगरसवेक निधीचा फन्ड त्या मुलांच्या चपला किंवा बुटासाठी वापरु शकतो का? याचे उत्तर लेखा परिक्षक देतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण नगरसेवक निधी या विद्यार्थ्यांच्या चप्पल किंवा बुटसाठी वापरु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांना गणवेश, सकस आहार देतो. परंतु, या विद्यार्थ्यांना चप्पल किंवा बुट द्यायच आपण याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन हा विषय पुन्हा आणूया.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय आधीच घ्यायला पाहिजे होता. आम्ही सांगितल्यावर तुम्ही हा विषय घेता हे योग्य नाही. आपण दुस-या शाळा किंवा कॉन्व्हेन्टना पैसे भरण्यापूर्वी तुम्ही हा विषय घ्यायला पाहिजे होता. आपण प्रथम आपले बघायला पाहिजे. आपण आपल्या शाळा विधीवत बघायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील तुम्ही विषय टर्न करु नका.

**रतन पाटील :-**

आपण जे शैक्षणिक अनुदान देतो. आपल्याला त्या अनुदानामधून या शैक्षणिक फन्डावर कोणताही फरक पडत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, फरक पडतो. कारण आपण जनतेला जो पैसा देतो तो सत्कारणी लावावा अशी आपली इच्छा असते. तुम्ही आपल्या शाळांचे विद्यार्थी सक्षम बनवावे असे माझे मत आहे. आणि माझे सांगणे हेच आहे. सहा महिने झाले. परंतु, अजुनपर्यंत त्या विद्यार्थ्यांना गणवेश दिलेला नाही.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही पुढच्या मिटींगला चप्पल किंवा बुट देण्याचा विषय घ्या. हा विषय महासभेपुढे गेला तरी चालेल.

**रतन पाटील :-**

साहेब, आपले महामंडळ आहे का? तुम्ही या विषयावर चर्चा करण्यासाठी प्रथम शिक्षण अधिका-यांना बोलवा.

**मोहन पाटील :-**

आपल्या मंडळाचा प्रभारी अध्यक्षांचा चार्ज मा. आयुक्तसाहेब सांभाळत आहेत.

**रतन पाटील :-**

आपल्या मंडळाचे प्रभारी अध्यक्ष मा. आयुक्तसाहेब आहेत. मग शिक्षण विषयक विचारांवर खुलासा करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांना या ठिकाणी बोलवा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती महोदय, आपण हा फन्ड शिक्षणावर खर्च करीत आहोत. या ठिकाणी समित्या वगैरे आहेत. जर आपण या वर्षासाठी हा फन्ड शैक्षणिक बाबतीमध्ये खर्च करत असाल तर आम्ही अशाप्रकारचा फन्ड पुढच्या वर्षी लायन्स क्लबसाठीसुध्दा मागु. ज्या शैक्षणिक संस्था आहेत ज्या संस्था गरिबांना मदत करतात, त्या संस्थांना अशाप्रकारे फन्ड देण्यासाठी ऑडिटर परमिशन देतील का?

**रतन पाटील :-**

महापालिकेला नगरसेवक निधीमधून फन्ड देण्याचा अधिकार नाही. परंतु, हा अधिकार नगरपालिकेला होता.

**मा. सभापती :-**

मग महापालिकेला फन्ड मोफत घालवायचा अधिकार आहे का? फन्ड मोफत घालविण्यापेक्षा दिलेला बरा असे मला वाटते.

**कैलासबेन जानी :-**

रु. १५ हजार रु. १५ हजार डोनेशन घेतात, त्या शाळांना अनुदान देऊ नये.

**रतन पाटील :-**

रु. १५ हजार रु. १५ हजार डोनेशन घेणा-या शाळांना अनुदान देऊ नये.

**कैलासबेन जानी :-**

आपण चिठ्ठी दिली तरी ती स्विकारली जात नाही.

**रतन पाटील :-**

नगरसेवकांची पत्रे फाडून टाकली जातात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही पत्र देता तेव्हा तुम्हाला त्या पत्राची पोच दिली जाते. मग पत्र फाडून टाकतात हे तुमचे म्हणणे योग्य नाही.

**रतन पाटील :-**

आपली पत्र पोहचल्याची प्रत असते. त्याबाबत माझे काहीही म्हणणे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, ठराव क्र. ९५ चे वाचन करावे.

**केशव घरत :-**

ह्या ठरावाच्या सह्या झालेल्या आहेत का?

**प्र. सचिव :-**

ह्या ठरावाच्या सह्या झालेल्या नाहीत.

**केशव घरत :-**

हा ठराव वाचलेला असताना परत कसा आला?

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, पान क्र. १२ वरील ठराव क्र. ९३ चे वाचन व्हावे. (ठरावाचे वाचन केले.) ह्या ठरावामध्ये शाळेचे मैदान शाळा चालू असताना भाड्याने देऊ नये असे सरळसरळ दिलेले आहे. तरीसुध्दा आपण शाळेचे मैदान भाड्याने देणे योग्य नाही आणि ह्या प्रोसिडिंगमध्ये हा पहिला विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, पान क्र.१५ वरील ठराव क्र.९५ बघा. ह्या ठरावामध्ये असे लिहलेले आहे की प्रशासनाकडे सादर केलेल्या गोषवा-यानुसार सदर ठेकेदारास जकात वसुलीची रक्कम आणि प्रतिपुर्तीची रक्कम परत करण्यास मंजूरी देण्यांत येत असुन सदर ठराव पारित करण्यांत येत आहे. याचा अर्थ असा झाला की आपण ती रक्कम त्याला परत करणार आहोत. तसेच, भिवंडी महानगरपालिकेने जकात ठेकेदाराला

रक्कम दिलेली नाही. मग आपली मिरा भाईंदर महानगरपालिका जकात रक्कम का देते? माझ्याकडे असलेल्या वर्तमानपत्रामधील बातमी मी तुम्हाला वाचून दाखवतो.

**गजानन भोईर :-**

परंतु, आपला जकात विषयीचा ठराव पास झालेला नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, तुम्ही आम्हाला बातमी वाचून दाखवू नका. मध्यंतरी मेडीकलला फी देण्याबाबतचा विषय आलेला असताना आपण त्यावेळेला पॉलिसी ठरविलेली होती. आपले मेडीकलचे व्यापारी वगैरे आहेत, ते औषधांच्या रुपाने लोकांची सेवा करतात. त्यांनी मागणी केलेली होती. आपण त्याबाबत मा. महापौर दालनामध्ये निर्णय घेतलेला होता आणि आपण त्यावेळेला हा विषय मंजूर करुन घेतला होता.

**गजानन भोईर :-**

आपला हा ठराव पास झालेला आहे का?

**मोहन पाटील :-**

आपला जकात विषयीचा ठराव पास झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भिवंडी महानगरपालिकेनेसुध्दा असाच ठराव पारित केलेला होता. तो ठराव कच्च्या कापडावरील जकात वगळण्याबाबत होता. आपल्या जकातचे ठेकेदार कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांनी भिवंडी महानगरपालिकेला अशी रक्कम परत देण्याबाबत अर्ज केलेला होता. परंतु, भिवंडी महानगरपालिकेने त्यांना ती रक्कम परत दिली नाही. शेवटी ते सुप्रीम कोर्टामध्ये गेले.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, तुम्ही आता ज्या विषयाबाबत बोलत आहात तो विषय या ठिकाणी येऊ शकत नाही. कारण आता प्रोसिडिंग मंजूरीचा विषय चालू आहे आणि प्रोसिडिंग मंजूरी ही ग्रॅमॅटिकल मिस्टेक सुधारण्यासाठी असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, जकातीच्या विषयाचा ठराव झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

जकात विषयीचा ठराव झालेला नाही. ठराव पेन्डिग आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेबांनी हे बरोबर आहे की, चुकीचे आहे याबाबत उत्तर द्यावे. एक महानगरपालिका पैसे परत देत नाही मग आपण पैसे कशाला परत द्यायचे. कारण दोघांना सारखे नियम आहेत.

**गजानन भोईर :-**

जर ठराव पास झालेला असेल तर त्या ठरावावर सुचक आणि अनुमोदक असणाऱ्या सदस्यांची सही आम्हाला दाखवा. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील, तुम्ही जकातीविषयीच्या ठरावावर सही केलेली आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

मी जकात विषयीच्या ठरावावर सही केलेली आहे.

**कैलासबेन जानी :-**

ठरावावर सही केलेली असेल तर दाखवा.

**गजानन भोईर :-**

आमचा जकातविषयीच्या ठरावाला विरोध आहे. तुम्ही आमचा विरोध नोंदवून घ्या.

**कैलासबेन जानी :-**

जकात विषयीच्या ठरावाला आमचा विरोध नोंदवून घ्या.

**रतन पाटील :-**

आमचा विरोध नोंदवून घ्या.

**गजानन भोईर :-**

तर तुमचा जकातच्या ठरावाला विरोध असेल तर विरोध नोंदवून घ्या. आम्ही जकातच्या ठरावाल विरोध करीत आहोत. जकात विषयीचा ठराव झालेला नव्हता. हा ठराव महासभेत पास झाल्यानंतर तसाच ठेवण्यांत आलेला होता. हा ठराव झालेला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, एक महानगरपालिका पैसे देते आणि एक महानगरपालिका पैसे देत नाही. मग आपण पैसे का द्यावेत? आपल्या महानगरपालिकेने लॉस का करुन घ्यायचा?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की, आपल्या त्या फर्मबरोबर जो करारनामा झालेला आहे, त्या करारनाम्यातील तरतुद आणि हा झालेला ठराव त्या अनुरुप ते बसत असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण जसे ॲग्रीमेन्ट केलेले आहे तसेच सेम ॲग्रीमेन्ट भिवंडी महानगरपालिकेनेसुध्दा केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला ती ॲग्रीमेन्ट तपासावी लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तोपर्यंत हा ठराव पेन्डिग ठेवा. तोपर्यंत तुम्ही जकात कॉन्ट्रॅक्टरला पैसे देऊ नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जकात विषयीचा ठराव झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही परत उद्या असे करणार मग काय उपयोंग आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही मागच्या प्रोसिडिंगमध्ये झालेल्या ठरावावर चर्चा करु नका. म्हणजे प्रश्न येणार नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, तुम्ही आता जे काही बोलतात त्याबाबत माझ्या माहितीप्रमाणे सांगायचे झाले तर तुम्ही या प्रोसिडिंगच्या वेळेला हजर नव्हते.

**गजानन भोईर :-**

ठेकेदारांना माहिती पडू दे. याच्या ज्या अटीशर्ती दिलेल्या होत्या त्या अटीशर्तीमध्ये सगळ्यांचा उल्लेख होऊ दे. त्याच्यावर अजून अटीशर्ती लावा. मग त्याच्याकडून पैसे घेण्याची काहीही गरज नाही. हा ठराव स्थायी समितीला झालेला नव्हता.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, मी या ठिकाणी तुमच्या परवानगीने बोलतो की, हा ठराव ग्रॅमॅटिकल मिस्टेकसाठी आलेला आहे. तुम्ही ह्या ठरावावर ग्रॅमॅटिकल मिस्टेकप्रमाणे चर्चा करायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपायुक्त साहेब, एका महानगरपालिकेने रितसर ॲग्रीमेन्ट केली. तुम्ही म्हणता की, भिवंडी महानगरपालिकेने पैसे दिलेले नाहीत. आपल्या महानगरपालिकेकडे अशी तरतुद आहे का? असे तुमचे म्हणणे आहे आहे. परंतु, भिवंडी महानगरपालिका पैसे देत नाही आणि आपली महानगरपालिका पैसे देते हे योग्य आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ठराव करणे आणि इम्प्लिमेन्टेशन करणे ह्या दोन निराळ्या गोष्टी आहेत. ठराव करुन ठरावाचे इम्प्लिमेन्टेशन झाले नाही हा एक वेगळा भाग आहे. या ठिकाणी ठराव झालेला वेगळा भाग आहे. आपल्याला या ठरावाच्या इम्प्लिमेन्टेशनची वाट बघायची आहे अशी तरतुद आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्याला असा ठराव करता येतो का? ते कायद्यात बसते का? आपण हे पैसे परत देणे कायदेशीररित्या योग्य आहे का?

**मोहन पाटील :-**

आपण जकातबाबत ठराव केलेला आहे.

**गजानन भोईर :-**

आपण जकातबाबत ठराव करणे योग्य आहे का?

**कैलासबेन जानी :-**

या ठरावात असा कुठलाही उल्लेख नाही.

**रतन पाटील :-**

आपण जकात अभिकर्त्याला पैसे परत देणे योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत मा. उपायुक्तांनी खुलासा करावा.

**केशव घरत :-**

नाकाडी साहेबांना खुलासा करायला सांगा.

**गजानन भोईर :-**

आपल्याला जकातविषयी असा ठराव करता येत नाही.

**रतन पाटील :-**

लेखा परिक्षक श्री. नाकाडी साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी याबाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

हा ठराव झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

जकात विषयीचा ठराव झालेला नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही ठराव मांडू नका. परंतु, महापालिकेला ऐवढे पैसे लुटायचे आहेत का? ते सांगा.

**गजानन भोईर :-**

आमच्या मताप्रमाणे ठराव झालेला नव्हता.

**जयंत पाटील :-**

मा. अध्यक्ष महाशय, आपण हा विषय महासभेला पाठवूया.

**मोहन पाटील :-**

जकात विषयीचा विषय झालेला आहे. आपण हा विषय महासभेत घेऊया. परंतु, सध्या प्रोसिडिंग मंजूरीचा विषय चालू आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील आणि सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील तुम्ही या सभेला हजर नव्हते. जेव्हा प्रोसिडिंग मंजूरीचा विषय येतो तेव्हा तुम्हाला या गोष्टीची जाणीव झाली पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा विषय या सभेमध्ये नाही याचा अर्थ आम्ही या विषयावर चर्चा करायची नाही असे आहे का? आम्हाला चुकीचे वाटले म्हणूण आम्ही बोललो.

**रतन पाटील :-**

भिवंडी महापालिकेचे नियम वेगळे आहेत आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नियम वेगळे आहेत असे आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भिवंडीचे मा. आयुक्त साहेब जकात ठेकेदाराला पैसे परत देत नाही. आपल्या मिरा भाईंदरचे मा. आयुक्त साहेब पैसे परत देतील का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण पैसे परत दिलेले आहेत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण पैसे परत देणार आहोत.

**मोहन पाटील :-**

आपण तो ठराव केलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याबाबत चाचणी होईल.

**मोहन पाटील :-**

आपण एखादा ठराव केल्यानंतर जेव्हा तो ठराव प्रोसिडिंगला येतो, तेव्हा प्रोसिडिंगमध्ये तुमचे वाक्य चेन्ज होत नाही. तुमची ग्रॅमॅटिकल मिस्टेक चेन्ज होते. तुम्ही तुमची सुचना लिहून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच्यामध्ये प्रशासनाची काय भुमिका आहे ती सांगा.

**रतन पाटील :-**

प्रशासनाची भुमिका सांगा.

**कैलासबेन जानी :-**

ह्याला सगळ्यांनी विरोध केलेला होता.

**गजानन भोईर :-**

सगळ्या नगरसेवकांनी विरोध केलेला होता.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, जर हा विषय कोर्टामध्ये गेला आणि कायदेशीर बाब निर्माण झाली तर आम्ही त्या गोष्टीला जबाबदार नाही.

**गजानन भोईर :-**

आमचा या गोष्टीला विरोध आहे. तुम्ही आमचा विरोध नोंदवून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही विरोध कशाला करता? तुम्ही प्रथम क्लिअर करा.

**मोहन पाटील :-**

तुम्ही चुकीचे बोलता. तुम्ही पार्टीचे विरुद्ध जाऊ नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी पार्टीचे बोलत नाही, मी माझ्या पक्षाचे बोलत नाही, माझे सहकार्यसुध्दा नाही. परंतु, भिवंडी महानगरपालिकेचे मा. आयुक्त पैसे देंण्यास नकार करीत आहेत.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, जकात बाबतचा ठराव झालेला आहे. ज्या विषयाचा ठराव झाल्यानंतर तुमची प्रोसिडिंगमध्ये ग्रॅमॅटिकल मिस्टेक असते, तेव्हा तुम्ही सुधारणा करता. त्यामुळे प्रश्न येत नाही.

**गजानन भोईर :-**

परंतु, ही जबाबदारी आपणच घेत आहेत हे या ठिकाणी स्पष्ट होत आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण ही जबाबदारी घेतो. म्हणूण आपल्याला विचार करावा लागेल. आपण महापालिकेतर्फे पैसे परत कशाला द्यायचे? महापालिकेला लॉस का करुन द्यायचा? उद्या काय झाले तर आम्ही जबाबदार आहेत.

**गजानन भोईर :-**

आम्ही जबाबदार आहेत. कारण या ठिकाणी आम्ही उपस्थित आहेत.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीमध्ये जे नविन मेंबर आलेले आहेत, ते जबाबदार असण्याचा प्रश्नच येत नाही.

**जयंत पाटील :-**

जकात ठेकेदाराला महापालिकेतर्फे पैसे देण्यास आमची मंजूरी नाही आणि आम्ही या गोष्टीला जबाबदार नाही अशी तुम्ही नोंद करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही आता बोलतात की आम्ही ठरावामध्ये बदल करु शकत नाही. आता सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी ह्या ठरावामध्ये बदल करण्यास सांगितला होता. परंतु, तुम्ही तो बदल केलेला नाही आणि आता सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी या गोष्टीला आम्ही जबाबदार नसल्याचे त्या ठरावात टाकायला सांगितलेले होते. मग तुम्ही लगेच ॲक्सेप्ट केले. तुम्ही असे कसे करता?

**मोहन पाटील :-**

तुम्ही बोलता की, प्रोसिडींगला आमचा विरोध नोंदवून घ्या, म्हणूण तसे केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही असे कसे म्हणता?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सभापती साहेब यांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

**केशव घरत :-**

तुम्ही एकीकडे विरोध आहे असे म्हणता.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात फायदा होणार आहे असा ठराव आहे का?

**मोहन पाटील :-**

हा ठराव झालेला आहे.

**रतन पाटील :-**

ह्या ठरावामध्ये बदल करा.

**मोहन पाटील :-**

ठराव बदलता येत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही महापालिकेचे नुकसान कशाला करत आहात.

**केशव घरत :-**

याचे उत्तर लेखा परिक्षकाने द्यावे.

**गजानन भोईर :-**

या ठरावावर दोन महिन्यापर्यंत सही झालेली नव्हती.

**रतन पाटील :-**

या ठरावावर दोन महिन्यापर्यंत सही झालेली नव्हती आणि आतापर्यंत सही झालेली नाही.

**कैलासबेन जानी :-**

ह्या ठरावावर सही झालेली होती का?

**मोहन पाटील :-**

या ठरावावर सही झालेली होती.

**रतन पाटील :-**

ठरावावर सही झालेली असेल तर तुम्ही ती सही आता दाखवा.

**कैलासबेन जानी :-**

त्या ठरावावर आतासुध्दा सही झालेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ठरावावर केलेली सही दाखवा. आम्ही ठराव एक्सेप्ट करतो. मग तुमचा प्रश्न मिटला.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आपल्याला असे पैसे परत देता येतात का? याचे उत्तर लेखा परिक्षक श्री. नाकाडी साहेबांनी द्यावे.

**कैलासबेन जानी :-**

जकात ठेकेदाराला असे पैसे परत देता येतात का? याचे उत्तर श्री. नाकाडी साहेब यांनी द्यावे.

**जयंत पाटील :-**

हा विषय मुळात महासभेचा आहे. हा विषय स्थायी समितीचा नाही.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेंब, आमची अशी विनंती आहे की, लेखा परिक्षक श्री. नाकाडी साहेबांना याचे निवेदन करायला सांगा. ते योग्य आहे की अयोग्य आहे ते श्री. नाकाडी साहेब सांगतील. ठराव केला की तो ठराव योग्य आहे की अयोग्य आहे याचा खुलासा श्री. नाकाडी साहेबांना करु द्या.

**गजानन भोईर :-**

हा ठराव आहे की नाही. मग त्याचा खुलासा श्री. नाकाडी साहेबांना करु द्या.

**रतन पाटील :-**

श्री. नाकाडी साहेबांना याच्यावर निवेदन करु दे. तुम्ही महापलिकेचे नुकसान कशाला करता?

**जयंत पाटील :-**

याच्यामुळे तुमच्या बजेटवर प्रॉब्लम होईल. तुमच्या बजेअमध्ये रु. ३५ लाख कमी होतील. श्री. नाकाडी साहेब, तुम्ही याच्यावर निवेदन करा.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, श्री. नाकाडी साहेबांना निवेदन करण्याची परवानगी द्यावी.

**सुधीर नाकाडी :-**

आता स्थायी समिती समोर औषधावरील जकात कर परत करण्याबद्दल विषय चर्चेला आलेला आहे. सध्या मिटींगमध्ये तो विषय प्रोसिडिंगमध्ये आलेला होता. या विषयाला जवळजवळ तीन चार महिने झालेले आहेत. त्यामुळे आम्हाला त्या संबंधीची यादी तपसुन द्यावी लागेल. जर डायरेक्ट यादी द्यायची म्हटले तर ते शक्य नाही. त्याबाबतचा निर्णय सभागृहाने द्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही आम्हाला लेखी द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ठराव होऊ द्या. म्हणजे योग्य होईल.

**जयंत पाटील :-**

हे योग्य आहे का?

**रतन पाटील :-**

हे योग्य आहे की अयोग्य आहे तेवढच सांगा.

**सुधीर नाकाडी :-**

करारनाम्याच्या अटीशर्ती बघाव्या लागतील. आम्ही करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यवाही करणार आहोत.

**गजानन भोईर :-**

आपण करारनाम्याच्या अटीशर्ती बघुनच जकातच्या विषयाला मंजूरी द्यावी.

**रतन पाटील :-**

मग हा विषय पेन्डिग ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भिवंडी महानगरपालिकेमध्ये सेम प्रॉब्लेम होता. भिवंडी महानगरपालिकेमध्ये सेम टाईपचे कॉन्ट्रॅक्ट होते. ती महानगरपालिका जकातची रक्कम परत न देण्याच्या निर्णयावर ठामपणे राहिली. मग आपली महानगरपालिका निर्णयावर ठामपणे का राहत नाही?

**सुधीर नाकाडी :-**

भिवंडी महानगरपालिकेचा प्रश्न वेगळा असेल. आपल्याला भिवंडी महानगरपालिकेचा प्रश्न बघावा लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भिवंडी महानगरपालिकेचा प्रश्न सेम आहे.

**सुधीर नाकाडी :-**

भिवंडी महानगरपालिकेचा प्रश्न सेम नाही. वेगळा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तोपर्यंत आपण काय करणार?

**जयंत पाटील :-**

श्री. नाकाडी साहेब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार सगळ्या महानगरपालिका चालत असतात.

**सुधीर नाकाडी :-**

त्यांच्या अटीशर्ती वेगळ्या असतील.

**मोहन पाटील :-**

प्रत्येकांच्या अटीशर्ती वेगळ्या असतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या महानगरपालिकेने ॲग्रीमेन्ट पाठविल्या त्या ॲग्रीमेन्ट सबमिट केलेल्या नाहीत. असा मी आरोप करीत आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही त्याच्या अटीशर्ती सबमिट करा.

**कैलासबेन जानी :-**

काय-काय अटीशर्ती होत्या, त्या वाचून दाखवा.

**जयंत पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे त्यांना आपल्याकडून पैसे अदा केलेले नाहीत.

**रतन पाटील :-**

तुम्ही सदर बिले महासभेच्या तपासणीसाठी पाठवा.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही अटीशर्ती वाचून दाखविपर्यंत आम्ही या प्रोसिडिंगला मंजूरी देणार नाही.

**मोहन पाटील :-**

पुढचे इतिवृत्त घेण्यात यावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रथम याचा खुलासा होऊ दे.

**गजानन भोईर :-**

ठराव क्र.९५ ला आमची मंजूरी नाही.

**रतन पाटील :-**

हा विषय महासभेला पाठवा.

**मा. सभापती :-**

ज्या सन्मा. सदस्यांचा या विषयाला विरोध असेल त्यांनी विरोध नोंदवावा आणि पुढच्या विषय घेण्यात यावा.

**रतन पाटील :-**

तुम्हाला या महापालिकेचे नुकसान करायचे आहे असे वाटत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जोपर्यंत हा विषय क्लिअर होत नाही. तोपर्यंत तुम्ही पुढे जाऊ नका. प्रथम या विषयावर चर्चा करा.

**गजानन भोईर :-**

प्रथम या विषयावर मा. सभापती साहेबांना रुलिंग होऊ दे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांनी रुलिंग दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती महोदयांनी काय रुलिंग दिले? तेच समजले नाही.

**मा. सभापती :-**

ज्या सन्मा. सदस्यांना विरोध करायचा असेल त्यांचा विरोध नोंदविण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी विरोधाची गोष्ट करीत नाही. या ठिकाणी ठराव पास झालेला आहे. तुम्ही त्यावेळेला विरोध करायला पाहिजे होता. आता माझे असे म्हणणे आहे की भिवंडी महानगरपालिका पैसे द्यायला नाही बोलते आणि आपल्या मिरा भाईंदरच्या स्थायी समितीचे सन्मा. सदस्य पैसे द्यायला हो का बोलतात? ते आम्हाला कळले पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपल्या संबंधित अधिका-यांनी ॲग्रीमेन्ट काय आहे ते बघितल्यानंतर उत्तर देणार असे सांगितलेले आहे.

**जयंत पाटील :-**

ॲग्रीमेन्ट बघेपर्यंत पैसे आकारले जाणार नाहीत.

**गजानन भोईर :-**

त्यांचे डिपॉझीट देऊ नये.

**जयंत पाटील :-**

जोपर्यंत त्यांच्या अटीशर्ती पूर्ण होत नाही, तोपर्यंत तुम्ही त्या जकात ठेकेदाराला कुठल्याही त-हेचे पैसे आकारु नयेत.

**मा. सभापती :-**

पैसे अदा झालेले आहेत.

**रतन पाटील :-**

पैसे अदा कसे झाले?

**मोहन पाटील :-**

ठराव झाल्यानंतर बांधकामाची कामे, गटाराची कामे आणि सगळी इतर कामे होत आहेत. ठराव झालेला आहे आणि आपण त्या ठरावाचे इम्प्लिमेन्टेशन करीत आहोत. सचिव साहेब, जर ही जुनी सभा असेल तर नविन सदस्य त्याच्यावर हरकत घेऊ शकतात का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही हरकत घेतलेली नाही. आम्ही फक्त मत व्यक्त केलेले आहे.

**प्र. सचिव :-**

ज्यावेळेला इतिवृत्तांतामध्ये जे विषय होते आणि जे सदस्य उपस्थित होते तेच सन्मा सदस्य या इतिवृत्तांतामध्ये बदल किंवा दुरुस्ती सुचवू शकतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही दुरुस्ती सुचवत नाही आणि विरोधसुध्दा करत नाही. आम्हाला जी माहिती पाहिजे ती एक महानगरपालिका देत नाही. म्हणजे ती महानगरपालिका स्वतःचा फायदा करते. त्या महानगरपालिकेचा आयुक्त ती माहिती देत नाही म्हणजे ते आयुक्त आपल्या महानगरपालिकेचा फायदा करीत आहे आणि एक आयुक्त आपल्या महानगरपालिकेचे नुकसान करीत आहे असे आहे का? तुम्ही मा. आयुक्त साहेबांना या मिटींगमध्ये बोलवा.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब सध्या बाहेरगावी गेलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, या विषयाबाबत ज्या सन्मा. सदस्यांच्या सुचना असतील किंवा ज्या सन्मा. सदस्यांना मा. आयुक्त साहेबांकडून माहिती हवी असेल त्यांनी मा. आयुक्त साहेबांकडून माहिती घ्यावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हाला विषय समजला नाही. म्हणूण आम्ही तुम्हाला विचारले. आता विषय आलेला आहे म्हणूण आम्ही बोललो. अन्यथा मा. आयुक्त साहेबांकडून माहिती घ्यायची हे आम्हाला माहिती नव्हते.

**गजानन भोईर :-**

आम्हाला ही प्रोसिडिंग उशीरा मिळाली हे समजले म्हणूण ठिक आहे. नाहीतर आम्ही हा विषय पुढच्या मिटींगला घ्यायला सांगत होतो. आमचा चार जणांचा विरोध नोंदवून घ्या.

**ज्युडी डिसोझा :-**

आम्हाला ठराव क्र. ९४ ची माहिती पाहिजे.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील हे ठराव क्र. ९५ ला विरोध करु शकत नाहीत. त्यांना विचारा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव क्र. ९५ ला विरोध करण्याचे काय कारण आहे?

**मा. सभापती :-**

हा विषय आपल्यासमोर मंजूरीला आलेला आहे.

**गजानन भोईर :-**

ते तुम्ही बघा. सन्मा. सदस्य रतन पाटील विरोध करु शकतात की नाही तेवढेच आम्हाला सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, या इतिवृत्तांताला सर्व सन्मा. सदस्यांनी मेजोरिटीने विरोध केला तर हे इतिवृत्त मंजूर होईल का? जर उपविधीला विरोध केला तर हे इतिवृत्त नामंजूर होईल.

**प्र. सचिव :-**

जर इतिवृत्तांताला फक्त दुरुस्ती करायची असेल तर त्या इतिवृत्तांताला नामंजूरीचा प्रश्न येत नाही. फक्त ग्रॅमॅटिकल मिस्टेक सुधारायच्या असतात.

**केशव घरत :-**

हा ठराव मंजूर झाला नसेल.

**गजानन भोईर :-**

हा ठराव स्थायी समितीमध्ये झालेला नाही.

**कैलासबेन जानी :-**

हा ठराव स्थायी समितीमध्ये झालेला नाही.

**गजानन भोईर :-**

या ठरावावर सही करणरे श्री. प्रेमनाथ पाटील यांनीसुध्दा या ठरावाला विरोध केलेला होता.

**केलासबेन जानी :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी या ठरावाला विरोध केलेला होता.

**गजानन भोईर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी जकातच्या ठरावाला विरोध केलेला होता.

**रतन पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी या ठरावाला विरोध केलेला होता.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही त्यावेळेला हजर नव्हते.

**रतन पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी विरोध केल्याचे मी प्रोसिडिंगमध्ये वाचलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, इतिवृत्तांत कायम करणे याचा काय अर्थ होतो?

**प्र. सचिव :-**

मागच्या वेळेला ज्या विषयावर चर्चा झाली ती चर्चा कायम करणे. त्याच्यामध्ये बदल करायचा नाही.

**गजानन भोईर :-**

मागच्या वेळेला काहीही झालेले नाही. हे नंतर बसवलेले आहे. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी हे सगळे केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमच्या पक्षाचे अध्यक्ष श्री. मोहन पाटील आहेत. याबाबत काय करायचे? ते त्यांनीच सांगावे.

**मोहन पाटील :-**

आपण ह्या प्रोसिडिंगला मंजूरी द्यायची आहे. या विषयाला उपस्थित असलेले सन्मा. सदस्य या विषयावर बोलतील.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील तुम्ही त्या मिटींगमध्ये या ठरावाला विरोध केलेला होता की नव्हता?

**प्रेमनाथ पाटील :-**

मी त्या ठरावाला विरोध केला असता तर मी अनुमोदन कसे दिले असते?

**कैलासबेन जानी :-**

टेप वाजवून बघा मग कळेल.

**गजानन भोईर :-**

सचिव साहेब, या ठरावाला सन्मा. सदस्य रतन पाटील विरोध करु शकतात का? समजा, सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस यांना विरोध करायचा असेल तर आम्ही काय करायचे? आता हे सन्मा. सदस्य विरोध करु शकतात हे प्रथम तुम्ही मला सांगा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील या ठरावाला विरोध करु शकत नाहीत.

**गजानन भोईर :-**

जर सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस यांना विरोध करायचा असेल तर त्याची नोंद हाईल का? जो बोलला तोही याच्यामध्ये येईल.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेब, तुमचा ठराव आलेला नव्हता.

**गजानन भोईर :-**
ठराव आलेला आहे. परंतु, त्यावेळेला ठराव नव्हता.
**मा. सभापती :-**
ज्यावेळेला विषय येईल त्यावेळेला बघण्यात येईल.
**गजानन भोईर :-**
त्यावेळेला हा ठराव नव्हता. हा ठराव चार पाच दिवसापूर्वी घुसलेला आहे. आमचे संभाषणसुध्दा टेपमध्ये नाही.
**रतन पाटील :-**
साहेब, ही मिटींग तहकुब करा आणि टेप वाजवा.
**कैलासबेन जानी :-**
सचिव साहेब, टेप आणा.
**सुर्यकांत भोईर :-**
प्रथम टेप वाजवा.
**मोहन पाटील :-**
टेप नंतर वाजविण्यात येईल.
**रतन पाटील :-**
टेप वाजवायला काय हरकत आहे?
**गजानन भोईर :-**
या ठरावाला मा. सभापती साहेबांची मंजूरी असेल तरच आम्ही मंजूरी देतो. परंतु, या ठरावाला मा. सभापती साहेबांची नामंजूरी आहे.
**मा. सभापती :-**
माझी मंजूरी असेलच.
**मोहन पाटील :-**
मा. सभापती साहेबांची मंजूरी आहे.
**गजानन भोईर :-**
मा. सभापती साहेब, तुम्ही त्यावेळेला सभापती पदावर नव्हते मग तुम्ही मंजूरी कशी देता?
**मा. सभापती :-**
सध्या मी पीठासीन अधिकारी आहे आणि हा कारभार आता माझ्या ताब्यात आहे. म्हणूण मी त्याला मंजूरी देत आहे.
**गजानन भोईर :-**
मग तुम्ही त्याला जबाबदार आहात. याला सन्मा. सदस्य जबाबदार नाही का?
**मा. सभापती :-**
ज्यांनी ठराव पास केला ती लोक त्या ठरावाला जबाबदार असतात. या ठिकाणी इतिवृत्तांताचे वाचन झालेले आहे.
**गजानन भोईर :-**
हे सन्मा. सदस्य त्या ठरावाला जबाबदार आहेत का?
**मा. सभापती :-**
हे सन्मा. सदस्यसुध्दा त्या ठरावाला जबाबदार आहेत.
**रतन पाटील :-**
साहेब, या ठरावाला कोणी विरोध केला? कोणी विरोध केला नाही? ते या ठिकाणी लिहलेले आहे. तुम्ही ते वाचा.
**मोहन पाटील :-**
तुम्ही नंतर ते वाचून घ्या.
**गजानन भोईर :-**
चार जणांचा विरोध नोंदवून घ्या.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
विरोध नोंदविण्याची काय गरज आहे? तुमच्या हाताने ठराव होऊ शकत नाही. कारण ठराव आधीच पास झालेला आहे.
**रतन पाटील :-**
मा. सभापती साहेब, टेप वाजवून बघा.
**मा. सभापती :-**
हा विषय मागच्या मिटींगला पास झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

हा विषय मागच्या मिटींगमध्ये पास झालेला नव्हता.

**मा. सभापती :-**

हा विषय मागच्या मिटींगमध्ये पास झालेला नव्हता, तर तुम्ही मा. आयुक्त साहेबांबरोबर पत्रव्यवहार करा.

**गजानन भोईर :-**

आम्ही मा. आयुक्त साहेबांबरोबर पत्रव्यवहार कसा करणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, पान क्र.१४ वर मी ह्याच्यामध्ये बोललेलो नाही ते या ठिकाणी आलेले आहे.

( सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

या प्रोसिडिंगमध्ये पान क्र. १५ मधील ठराव क्र. ९५ ला सन्मा. सदस्य गजानन भोईर, सन्मा. सदस्या, कैलासबेन जानी, सन्मा. सदस्य रमेश जैन, सन्मा. सदस्य रतन पाटील या चौघांचा विरोध लेखी नोंदवून घ्या.

**मोहन पाटील :-**

सचिव साहेब, ठरावाला कायद्याप्रमाणे नामंजूरी नोंदवता येत असेल तर नोंदवा. नामंजुरी नोंदवता येत नसेल तर प्रश्न येत नाही.

**गजानन भोईर :-**

आमच्यासमोर हा ठराव झालेला नाही असे आमचे ठाम मत आहे.

**मा. सभापती :-**

या विषयाला मंजूरी दिलेली आहे. आपल्याकडे मा. उपायुक्त नविन आलेले आहेत. आपण त्यांचा मानसन्मान ठेवला पाहिजे. मी मा. उपायुक्त (मु.) यांचा या ठिकाणी सत्कार करीत आहे.

(मा. उपायुक्त (मु.) सो. यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.)

**प्रकरण क्र. १५२ :-**

दि. ३०/०७/२००५ व दि. ३०/०७/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १५७ :-**

दि. ३०/०७/२००५ व दि. ३०/०७/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- ॲड. श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५३ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, प्रकरण क्र. १५३ चा गोषवारा दिलेला नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, प्रकरण क्र. १५३ महानगरपालिका कर्मचारी किंवा त्यांच्या कुटूंबियांना निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या वैद्यकिय उपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीचा गोषवारा प्रशासनाकडून आलेला नाही. म्हणूण मा. सभापती महोदयांनी या विषयाचा रितसर गोषवारा आणूण पुढच्या मिटींगला हा विषय घ्यावा.

**गजानन भोईर :-**

हा कर्मचाऱ्यांचा विषय सात महिन्यापूर्वी पाठविलेला होता.

**मा. सभापती :-**

परंतु, या विषयावर गोषवारा तयार नसल्यामुळे हा विषय घेऊ शकत नाही.

**गजानन भोईर :-**

सात महिने झाले तरी अजून गोषवारा तयार होत नाही का?

**मा. सभापती :-**

आपण हा विषय पुढच्या मिटींगला घेऊया.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, हा विषय कर्मचा-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय आहे. वैद्यकिय विषयांवर हा विषय आहे. आपल्याकडे गोषवारा नसला तरी संबंधित अधिका-याने सभागृहाला चांगली माहिती दिली आणि आपल्याला ती माहिती योग्य वाटली तर आपण त्यासंबंधी निर्णय देऊ.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही मांडता तो विषय चांगला आहे आणि मी तुमच्या मताशी सहमत आहे.

**जयंत पाटील :-**

कर्मचा-यांना किंवा त्यांच्या कुटूंबियांना निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या वैद्यकिय उपचाराबाबतचा हा विषय आहे. माणूस वैद्यकिय उपचार अतिशय अडचणीच्या वेळी घेतो. त्यासंबंधी माहिती असेल तर द्या.

**प्रकरण क्र. १५३ :-**

महानगरपालिका कर्मचा-यांनी किंवा त्यांच्या कुटुंबियांनी निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या वैद्यकिय उपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीबाबत.

**ठराव क्र. १५८ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५४ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, नापास झालेल्या कर्मचा-यांनासुध्दा परिक्षा फी, प्रवेश फी आणि आभ्यासक्रम फी द्यायची आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

ह्याच्यापूर्वीच्या परिक्षा उत्तीर्ण असेल त्यालाच ही सुविधा दिली जाणार आहे.

**प्रकरण क्र. १५४ :-**

एल.एस.जी.डी. व एल.जी.एस. अभ्यासक्रम यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना त्यांनी भरलेले प्रवेश फी, अभ्यासक्रम फी व परिक्षा फी अदा करणेबाबत.

**ठराव क्र. १५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ चे कर्मचारी वेळोवेळी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत घेण्यांत येणा-या एल.एस.जी.डी. व एल.जी.एस. अभ्यासक्रमामध्ये सहभाग घेऊन अभ्यासक्रम यशस्विरित्या पूर्ण करिता असतात. यशस्वीरित्या अभ्यासक्रम पूर्ण करणा-या कर्मचा-यांना त्यांनी सदर अभ्यासक्रमासाठी भरलेली प्रवेश फी, अभ्यासक्रम फी, प्रवास भत्ता व परिक्षा फी शासन परिपत्रक क्र. टीआरएन/१०७२/१८९४०-एस, दि. १८/१२/१९७८ अन्वये अदा करणेबाबत निर्देशित केलेले आहे. ज्या कर्मचा-यांनी नगरपालिका/महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेऊन एल.एस.जी.डी. व एल.जी.एस. अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला आहे. अशा कर्मचा-यांना सदर अभ्यासक्रमासाठी भरलेली प्रवेश फी, अभ्यासक्रम फी, प्रवास भत्ता व परिक्षा फी शासन परिपत्रक क्र. टीआरएन/१०७२/१८९४०-एस, दि. १८/१२/१९७८ अन्वये अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

तसेच जे कर्मचारी यापुढे महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेऊन एल.एस.जी.डी. व एल.जी.एस. अभ्यासक्रम पूर्ण करतील अशा कर्मचा-यांना त्यांनी अभ्यासक्रमासाठी भरलेली प्रवेश फी, अभ्यासक्रम फी, प्रवास भत्ता व परिक्षा फी शासन परिपत्रक क्र. टीआरएन/१०७२/१८९४०-एस, दि. १८/१२/१९७८ अन्वये तसेच वेळोवेळी जाहिर होणा-या शासन निर्णय/परिपत्रकानुसार अदा करणेंस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५५ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण या ठिकाणी दुतर्फी बसवणार आहोत. ते फक्त हॉटेलपर्यंत बसविणार आहोत की संपूर्ण घोडबंदर रस्त्यापर्यंत बसविणार आहोत.

**केशव घरत :-**

हे हॉटेलपर्यंत बसविणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हॉटेलपर्यंत बसविण्यापेक्षा संपूर्ण रस्त्यावर बसवा.

**रमेश जैन :-**

इसके लिये लगबग कितना खर्च आयेगा?

**मा. सभापती :-**

संबंधित अधिका-यांना अशा सुचना देण्यास येते. तिथे घोडबंदरचा किल्ला असल्यामुळे त्या किल्ल्यापर्यंत लावण्यात यावे.

**केशव घरत :-**

मा. सभापती साहेब, रस्ता पूर्ण झाला की घोडबंदरला जाऊया.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, अशा पध्दतीने शोभा येईल का? मी चुकीचे बोलत नाही.

(सन्मा. सदस्य केशव घरत यांनी ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

घोडबंदर जक्शंन ते स्पाईस गार्डन पर्यंतच्या पुढेपर्यंत म्हणजेच घोडबंदर किल्ल्यापर्यंत घ्या.

**रतन पाटील :-**

त्या हॉटेलकडूनच तो रस्ता घ्या.

**मोहन पाटील :-**

कनकियाच्या सिग्नकडून घ्या.

**प्रकरण क्र. १५५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत रा.म.क्र.८ वरील घोडबंदर जंक्शन ते स्पाईस गार्डन पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा Delineators बसविणेस परवानगी देणे.

**ठराव क्र. १६० :-**

वरील विषयानुसार राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर घोडबंदर जंक्शन (सगमादेवी मंदिर समोरुन) ते घोडबंदर गाव पर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही बाजुस Delineators, Redium सह खांबे स्वखर्चाने बसविण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. सदर Delineators बसविल्यामुळे रस्त्याच्या शोभेत भर पडणार असून रात्रीच्या वेळी वाहन चालकास वळण घेण्यास सुलभ होईल. सदर काम मे. स्पाईस गार्डन रेस्टॉरंट हे स्वखर्चाने करणार असल्याने परवानगी देण्यात यावी. सदर मुदत तीन वर्ष ठेवण्यांत यावी.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.१५६ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही या विषयाला मंजूरी द्या.

**गजानन भोईर :-**

ते मधले अनावश्यक काढावेच लागतात.

**सुर्यकांत भोईर :-**

काशिमिरा, सिल्व्हर पार्कचे असे मेन-मेन ठेवा.

**रतन पाटील :-**

साहेब, नऊ माणसे मेलेली आहेत आणि ज्यांना दुखापत झालेली आहे अशी पंधरा माणसे आहेत.

**गजानन भोईर :-**

दुखापत झालेली १५ माणसे नसुन ६५ माणसे आहेत.

**रतन पाटील :-**

मी या महिन्या भरातील गोष्ट करीत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा विषय महासभेपुढे जाणार आहे का?

**मोहन पाटील :-**

हा विषय महासभेपुढे शिफारशीसाठी जाणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण या विषयाची चर्चा स्थायी समितीपुढे करु शकत नाही का?

**मोहन पाटील :-**

आपण या विषयाची चर्चा स्थायी समितीपुढे करु शकतो. मग हा विषय स्थायी समितीमध्ये घेतल्यावर हा विषय महासभेपुढे जाण्याची गरज नाही.

**गजानन भोंईर :-**

हा विषय सथायी समितीपुढे जाऊ दे की महासभपुढे जाऊ दे. हा जास्त महत्वाचा विषय नाही. त्यामुळे या विषयाची चर्चा इकडेच होऊ दे.

**रतन पाटील :-**

साहेब, हा विषय आत्यावश्यक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय सर्वानुमते मंजूर करा.

**जयंत पाटील :-**

ह्या विषयाला महासभेची मंजूरी घ्या. कारण हा एक धोरणात्मक निर्णय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा धोरणात्मक निर्णय नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्याला ह्या विषयाबाबत महासभेने मागणी केलेली होती.

**गजानन भोईर :-**

आम्ही याच्यासाठी सहा महिने पत्र व्यवहार केलेला आहे. त्या दिवशी मी आणि सन्मा. सदस्य रोहीदास पाटील मा. आयुक्त साहेबांसमोर बसलेलो होतो. त्यावेळेला आमची मिटींग झाली. त्याच्यावर चर्चा झालेली आहे. त्यामुळे आपल्याला रिजेक्ट करायला काहीही हरकत नाही.

**मोहन पाटील :-**

तुम्ही या विषयाची महासभेला शिफारस करा. आमची या विषयाला मंजूरी आहे. आपण मंजूरीचे विषय महासभेमध्ये शिफारशीसाठी पाठवतो. ह्या रस्त्याचा शहराशी संपूर्णपणे संबंध आहे.

**दिपक खांबित :-**

हा महासभेचा विषय आहे.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय शिफारस करुन नंतर मंजूर केलेला आहे.

**गजानन भोईर :-**

या विषयाचा कोणाला ठराव मांडायचा असेल तर मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण हा विषय महासभेपुढे नेणार आहेत. परंतु, या टिपणीमध्ये आपण वाहतुक शाखेची परवानगी घेण्याबाबत लिहलेले आहे. आपण वाहतुक शाखेची परवानगी घेतल्यानंतर बंद करणार आहोत का?

**गजानन भोईर :-**

वाहतुक शाखेची परवानगी घेतीलच.

**केशव घरत :-**

आपल्या रस्त्यांना वाहतुक शाखेची परवानगी घ्यावी लागेलच.

**प्रेमनाथ पाटील :-**

सगळ्यांची परवानगी घ्यावी लागेल.

**सुर्यकांत भोईर :-**

वाहतुक शाखेच्या परवानगीची गरज नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांचे म्हणणे बरोबर आहे. वाहतुक शाखेच्या परवानगीची गरज नाही.

**गजानन भोईर :-**

आपला रस्ता आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपला रस्ता असला तर वाहतुक शाखेच्या परवानगीची काय गरज आहे.

**दिपक खांबित :-**

आपल्याला सगळ्यांची परवानगी घ्यावी लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण रस्ता बदलला तेव्हा परवानगी घेतलेली होती का?

**एस. ए. खान :-**

हा विषय पोलिसांनी दिलेला आहे.

**दिपक खांबित :-**

हा विषय पोलिसांनी दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय पोलिसांनी दिलेला असला तरी हा विषय वाहतुक शाखेकडे जाणार आहे. वाहतुक शाखेला या विषयाची गरज आहे. कारण हा रस्ता महानगरपालिकेने बनवलेला आहे. परंतु, हा रस्ता बनविताना ह्या रस्त्यावर डिव्हायडर बसविण्यासाठी वाहतुक शाखेची परवानगी घेतलेली होती का? ते तुम्ही सांगा मला. तुम्ही तेव्हा परवानगी घ्यायची काय गरज आहे.

**मोहन पाटील :-**

सिग्नल बसविताना वाहतुक शाखेची परवानगी घ्यावी लागते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सिग्नल बसविताना वाहतुक शाखेची परवानगी घेण्याचा प्रश्न येत नाही. परंतु, या ठिकाणी डिव्हायडर बसविण्याचा मुद्दा आलेला आहे.

**दिपक खांबित :-**

डिव्हायडर बनविताना वाहतुक शाखेची परवानगी घ्यावी लागते.

**गजानन भोईर :-**

डिव्हायडर बंद करायचा कोणाचाही विरोध नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

डिव्हायडर बंद करायचा कोणीही विरोध करीत नाही.

**मोहन पाटील :-**

आपल्याला ज्या परवानग्या पाहिजेत, आपण त्या परवानग्या घेऊया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परवानगी मिळत नाही म्हणूण हा प्रश्न या ठिकाणी उद्‌भवलेला आहे. आम्ही मे महिन्यामध्ये परवानगीसाठी अर्ज केलेला होता. आज डिसेंबर महिना आलेला आहे. तरीसुध्दा परवानगी मिळत नाही.

**मोहन पाटील :-**

श्री. दिपक खांबित, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील परवानगी मिळत नाही असे सांगत आहेत.

**दिपक खांबित :-**

परवानगी दिलेली आहे. प्रस्ताव मंजूरीला ठेवल्यावर दुस-या दिवशी परवानगी देतो बोलले होते. परंतु, अजुनपर्यंत परवानगी दिलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही मे महिन्यामध्ये प्रस्ताव देऊनसुध्दा अजुनपर्यंत परवानगी मिळालेली नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही गोषवारा वाचलेला दिसत नाही.

(सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही मध्यभागी ग्रील्स बसवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

कमीत कमी तीन ते चार फुटाचे ग्रील्स बसवा.

**गजानन भोईर :-**

ह्याच्यामध्ये आमची एक दुरुस्ती करा. आपण एकही ग्रील्स लावलेली नाही. त्यामुळे मध्यभागी कमीत कमी चार फुटाचे संपूर्णपणे ग्रील्स बसवा.

**सुर्यकांत भोईर :-**

तिकडे मागे गार्डन केलेले आहे.

**गजानन भोईर :-**
तुम्ही तिथे गार्डन कशासाठी केलेले आहे?
**सुर्यकांत भोईर :-**
लोकांच्या गाड्या वळून जाण्यासाठी त्या ठिकाणी गार्डन केलेले आहे.
**गजानन भोईर :-**
परंतु, ते बघायला बिल्डर तिथे उपस्थित असतात का?
**मा. सभापती :-**
ठराविक ठिकाणी पब्लिकला रस्ता क्रॉस करण्यासाठी जागा ठेवायची आहे.
**गजानन भोईर :-**
पब्लिक डिव्हायडरच्या मधल्या भागातुन चालणार नाही. तुम्ही झेब्रा क्रॉसिंग केले तर आमची हरकत नाही.
**प्रकरण क्र. १५६ :-**
छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर मध्यभागी रस्ता दुभाजकातील अनावश्यक प्रवेश बंद करणेबाबत विचार विनिमय करणे.
**ठराव क्र. १६१ :-**
वरील विषयानुसार छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा रस्ता महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेला असून सदर रस्त्यावर क्रॉस रस्त्यांना जास्त प्रमाणावर प्रवेश एंट्र्या असल्याने वाहनांना मुख्य रत्यावरुन वेगाने येणाऱ्या वाहनामुळे क्रॉस रस्त्यातून येणाऱ्या वाहनांना अपघात होऊन जिवित व मालमत्तेची हानी नाकारता येत नसल्याने मा. पोलिस निरीक्षक, मिरारोड, पोलिस स्टेशन यांनी करावयाच्या उपाययोजनेचे एक रेखाचित्र तयार करुन कारवाई करीता या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. सदर पत्रानुसार महानगरपालिकेने संयुक्त पाहणी करुन परवानगी देण्याकरीता मा. पोलिस निरीक्षक, वाहतूक शाख, ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे प्रस्ताव पाठविलेला होता. सदर प्रस्तावावर चर्चा करण्याकरीता स्थानिक पोलिस अधिकारी, वाहतूक शाखेचे अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत ठरवल्यानुसार सदर रस्त्यावरील, खालील प्रवेश / एंट्र्या सोडून इतर सर्व प्रवेश बंद करावयाचे आहेत.
१) शिवाजी महाराज पुतळ्या मागील पहिले दोन प्रवेश
२) सिल्वर पार्क जंक्शन (सिग्नलचे काम सुरु आहे.)
३) एस.के. स्टोन पोलिस चौकी जंक्शन (सिग्नलचे काम सुरु आहे.)
४) कनकिश पोलिस स्टेशनकडे जाणारा जंक्शन
५) शिवार गार्डन जंक्शन (सिग्नलचे काम सुरु आहे.)
